| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ९१ वा | शनिवार दिनांक १३ जून, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### शितपेयात दारु मिसळून केला लैंगीक अत्याचार

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील ३४ वर्षीय मुलगी दि.०९.०६.२०२६ रोजी हिस एका गावातील एक तरुणानी रुम भाड्याने करुन देतो असे म्हणत आपल्या म्हशीचे गोट्यावर बोलावून तेथुन जेवण करायला जावू असे म्हणून हॉटेलवर घेवून जावून शितपेयामधून दारु मिक्स करुन तिस प्यायला देवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.१०.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सर्विस किट व ८० लिटर डिझेलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी दत्ताप्रसाद उत्तरेश्वर भोसले, वय ४७ वर्षे, रा.रउळगाव पोस्ट गौडगाव ता. बार्शी जि. सोलापूर यांचे टॅकर क्र एमएच ०४ एचडी १४९७ चे कॅबिनमध्ये ठेवलेली रेटझेन कंपनीची रोड बनविण्याची मशीनची सर्विस किट व ८० लिटर डिझेल असे एकुण ८१,५३४ किंमतीचे मुनीशकुमार रा. १२८ विलेज समाधान शहाजानपुर उत्तर प्रदेश ह.मु. धाराशिव गॅनचंद्र सत्यवीर रा. सुलतानपुर तिहार शहाजानपुर उत्तरप्रदेश ह.मु. धाराशिव यांनी दि. ०९.०६.२०२६ रोजी समता नगर धाराशिव येथुन चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- दत्ताप्रसाद भोसले यांनी दि.१०.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## रोजगार व उद्योग क्षेत्राच्या व्यापक सर्वेक्षणाचा शुभारंभ: नागरिकांनी अचूक माहिती देऊन सहकार्य करावे - जिल्हाधिकारी कीर्तीकिरण पुजार



धाराशिव (जिमाका ) देशातील रोजगार,बेरोजगारी तसेच असंघटित क्षेत्राच्या आर्थिक स्थितीबाबत अद्ययावत आणि विश्वासार्ह माहिती उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयामार्फत (MoSPI) नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण (Periodic Labour Force Survey-PLFS) २०२६ आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण (Annual Survey of Unincorporated Sector EnterprisesA SUSE) २०२६ राबविण्यात येत आहे.या महत्त्वपूर्ण सर्वेक्षण उपक्रमाचा शुभारंभ आज १२ जून रोजी शुक्रवारी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते करण्यात आला.

या सर्वेक्षणांच्या माध्यमातून देशातील रोजगार, बेरोजगारी, स्वयंरोजगार,उद्योग-व्यवसाय आणि असंघटित क्षेत्रातील आर्थिक घडामोडींची अचूक माहिती संकलित केली जाणार आहे.केंद्र व राज्य शासनाच्या विविध धोरणांच्या आखणीसाठी तसेच रोजगार निर्मिती व उद्योगविकासाशी संबंधित निर्णय प्रक्रियेसाठी या सर्वेक्षणातील माहिती महत्त्वाची ठरणार आहे.

यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, सर्वेक्षणासाठी भेट देणाऱ्या अधिकृत कर्मचाऱ्यांना आवश्यक ती माहिती प्रामाणिकपणे व अचूकपणे उपलब्ध करून द्यावी.नागरिकांच्या सहकार्यामुळेच रोजगार व उद्योग क्षेत्राचे वास्तव चित्र समोर येण्यास मदत होणार असून विकासाभिमुख धोरणे अधिक परिणामकारकपणे राबविता येतील.

या कार्यक्रमास जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) स्वाती शेंडे,जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपसंचालक सुधाकर जाधव तसेच जिल्हा सांख्यिकी कार्यालय आणि जिल्हा नियोजन समिती कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण : सूचना व अभिप्राय मागविले

धाराशिव, (जिमाका) राज्यातील विधवा,घटस्फोटित, परित्यक्ता,अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी स्वतंत्र 'एकल महिला धोरण' तयार करण्यात येत असून,हे धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख आणि परिणामकारक व्हावे यासाठी राज्यातील एकल महिला,नागरिक,स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते,अभ्यासक, संशोधक आणि विषयतज्ज्ञ यांच्याकडून सूचना व अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

एकल महिलांच्या समस्या केवळ मांडण्याऐवजी त्या समस्यांवर शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना कराव्यात,कोणत्या नवीन योजना सुरू कराव्यात, विद्यमान योजनांमध्ये कोणते बदल करावेत तसेच आवश्यक असल्यास कोणत्या कायद्यांमध्ये किंवा नियमांमध्ये सुधारणा कराव्यात, याबाबत सविस्तर सूचना पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सूचना पाठविताना केवळ त्रोटक स्वरूपातील मते न पाठविता संबंधित विषयाची पार्श्वभूमी, अपेक्षित उपाययोजना,संभाव्य लाभार्थी आणि अपेक्षित परिणाम यांचा समावेश असलेले सविस्तर प्रस्ताव सादर करावेत,असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. समाजातील एकल महिला तसेच सर्व संबंधित घटकांचा सक्रिय सहभाग या धोरण निर्मिती प्रक्रियेत असणे आवश्यक असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

सूचना व अभिप्राय शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी ८२०८५८९१९५ या व्हॉट्सप क्रमांकावर अभिप्राय पाठविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.प्राप्त होणाऱ्या सूचना व अभिप्रायांचा 'एकल महिला धोरणा'चा मसुदा तयार करताना योग्य तो विचार करण्यात येणार आहे.

दरम्यान,जिल्ह्यातील सर्व नागरिक, स्वयंसेवी संस्था,महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते,अभ्यासक व विषयतज्ज्ञ यांनी १७ जून २०२६ पर्यंत जिल्हा परिषद सभागृह, धाराशिव येथे आयोजित करण्यात आलेल्या या महत्त्वपूर्ण उपक्रमात सहभागी व्हावे,असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, धाराशिव यांनी केले आहे.

## पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्या नेतृत्वाखाली अनैतिक देहव्यापाराविरोधात निर्णायक कारवाई

धाराशिव (शेख अंजुम)- शिराढोण पोलीस ठाणे अंतर्गत पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिराढोण पोलीस ठाणेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कोळेकर यांच्या पथकाने शिराढोण पोलीस ठाणे हद्दीतील अवैध धंद्यांविषयी माहिती काढुन कायदेशीर कारवाई करण्यासाठी दि. ११.०६.२०२६ रोजी गस्तीस होते. गस्ती दरम्यान पथकास माहिती मिळाली कि, नायगाव शिवारातील नायगाव ते मुरुडकडे जाणारे रोडवर एका लॉज येथे हॉटेलमध्ये काही महिलांद्वारे वेश्या व्यवसाय करवुन घेत आहेत. यावर पथकाने एका बनावट ग्राहकास तेथे पाठवून बातमीची खात्री करुन सदरील लॉजवर छापा

टाकला असता लॉज मध्ये दोन महिला आढळुन आल्याने महिला पोलीसांमार्फत त्यांची विचारपुस केली असता अक्षय रा. मुरुड ता. जि. लातुर, लॉज मॅनेजर अजय रा. मुरुड ता. जि. लातुर यांचे सांगण्यावरुन त्या महिलांना वाणिज्यिक प्रयोजनाकरीता आश्रय देउन त्यांना लैंगीक स्वैराचाराकरीता परावृत्त करत होते व नमुद दोघेजण त्यावर स्वत:ची उपजिवीका करत आहेत असे समजले. यावरुन पथकाने नमुद दोघांना ताब्यात घेउन त्यांच्या ताब्यातील मोबाईल फोन, नोंदीचे रजिस्टर, रोख रक्कम ५,३०० व निरोधची पाकीट असा एकुण १५,४२० माल हस्तगत केला.

पोलीसांनी संबंधीत वेश्या व्यवसाय करणाऱ्या लॉजवरील त्या महिलांची सुटका करुन गुन्हा नोंदवला आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिराढोण पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक श्री कोळेकर पोलीस ठाणे शिराढोणचे पोलीस पथकाने केली. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## १५ जून रोजी धाराशिवमध्ये शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा;टाटा मोटर्समध्ये संधी

धाराशिव (जिमाका) -व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रामार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), धाराशिव येथे १५ जून २०२६ रोजी शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या भरती मेळाव्यात नामांकित टाटा मोटर्स,पिंपरी (पुणे) कंपनीचे प्रतिनिधी सोमेश्वर सोनवणे उपस्थित राहणार आहेत.

या भरती मेळाव्यात मोटार मेकॅनिक, डिझेल मेकॅनिक, फिटर, मशिनिस्ट, टूल अँड डाय मेकर,वेल्डर, शीट मेटल, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक आदी ट्रेडमधील प्रशिक्षणार्थींनी बायोडाट्यासह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

भरती प्रक्रियेत अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना अप्रेंटिसशिप कालावधीत प्रतिमाह १९ हजार ८५० रुपये विद्यावेतन देण्यात येणार आहे. याशिवाय महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रतिमाह ३ हजार ५०० रुपये इतकी अतिरिक्त प्रोत्साहनपर रक्कम राज्य शासनाकडून दिली जाणार आहे.

जुलै २०२६ मध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षेस पात्र होणाऱ्या प्रशिक्षणार्थींनीही या भरती मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच यापूर्वी आयटीआय किंवा एमसीव्हीसी उत्तीर्ण झालेल्या आणि अद्याप शिकाऊ उमेदवारी (Apprenticeship) न मिळालेल्या प्रशिक्षणार्थींनाही ही सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

हा भरती मेळावा १५ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिव येथे होणार असून इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे व बायोडाटा घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य तसेच सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार एम.एस.बिरादार यांनी केले आहे.

टाटा मोटर्ससारख्या अग्रगण्य कंपनीत शिकाऊ उमेदवारीची संधी उपलब्ध होत असल्याने धाराशिवसह परिसरातील आयटीआय व एमसीव्हीसी प्रशिक्षणार्थींसाठी हा भरती मेळावा रोजगाराच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे.

## धाराशिवमध्ये रोजगार व उद्योग क्षेत्राचा व्यापक सर्वेक्षण उपक्रम नागरिकांनी माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन

धाराशिव (जिमाका)- देशातील रोजगार,बेरोजगारी आणि असंघटित क्षेत्राच्या आर्थिक स्थितीबाबत अद्ययावत व विश्वासार्ह माहिती उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयामार्फत (चेड्झख) नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण (Periodic Labour Force Survey-PLFS) 2026 आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण (-nnual Survey of Unincorporated Sector Enterprises-ASUSE) 2026 राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रात हे सर्वेक्षण जागतिक बँकेच्या सहकार्याने 'महास्ट्राईड' प्रकल्पांतर्गत अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाच्या मार्गदर्शनाखाली राबविले जाणार असून,क्षेत्रीय कामकाजासाठी IPSOS या बाह्य संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणांतर्गत रोजगार व बेरोजगारीविषयक सर्वेक्षणे यापूर्वी नियमितपणे घेतली जात होती.मात्र बदलत्या आर्थिक परिस्थितीत कामगार बाजारपेठेबाबत अधिक वारंवार आणि अद्ययावत माहिती उपलब्ध व्हावी,तसेच ग्रामीण व शहरी भागांसाठी रोजगार व बेरोजगारीचे वार्षिक अंदाज तयार करता यावेत, यासाठी राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०१७ पासून PLFS सर्वेक्षण नियमितपणे राबविण्यात येत आहे.

**PLFS सर्वेक्षणातून काय मोजले जाणार**

या पाहणीचा प्रमुख उद्देश देशातील श्रमबाजाराचे महत्त्वाचे निर्देशांक निश्चित करणे हा आहे.त्यामध्ये श्रमशक्ती सहभाग दर (LFPR), कामगार-लोकसंख्या गुणोत्तर (WPR) आणि बेरोजगारी दर (UR) यांचा समावेश आहे.हे निर्देशांक चालू साप्ताहिक स्थितीच्या (Current Weekly Status-CWS) आधारे तयार केले जातात.ग्रामीण व शहरी भागांसाठी दरमहा तसेच राज्य,केंद्रशासित प्रदेश आणि राष्ट्रीयस्तरावर दर तिमाही कालावधीत हे अंदाज प्रसिद्ध करण्यात येतील.

याशिवाय बहुतेक जिल्ह्यांसाठी ग्रामीण व शहरी विभागनिहाय वार्षिक जिल्हास्तरीय अंदाजही तयार करण्यात येणार आहेत.या अंदाजांसाठी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय आणि राज्यस्तरीय नमुने एकत्रित करून विश्लेषण केले जाणार आहे.

PLFS अंतर्गत मासिक व तिमाही बुलेटिनमध्ये श्रमशक्ती सहभाग दर, कामगार-लोकसंख्या गुणोत्तर, बेरोजगारी दर तसेच रोजगाराची स्थिती आणि उद्योगनिहाय वर्गीकरणाची माहिती प्रसिद्ध केली जाईल.वार्षिक अहवालात वयोगट, लिंग,शैक्षणिक स्तर,रोजगाराचे प्रकार,उद्योगनिहाय वितरण, व्यवसाय वर्गीकरण,अनौपचारिक क्षेत्रातील रोजगार,रोजगारातून मिळणारे उत्पन्न आणि कामाच्या तासांबाबत सविस्तर माहिती प्रसिद्ध होणार आहे.

**असंघटित क्षेत्राच्या अर्थकारणाचा वेध घेणार ASUSE**

असंघटित क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा घटक असून रोजगारनिर्मिती आणि सकल देशांतर्गत उत्पादनात (GDP) त्याचे मोठे योगदान आहे.या क्षेत्राची आर्थिक आणि कार्यात्मक वैशिष्ट्ये समजून घेण्यासाठी -डणडए २०२६ हे सर्वेक्षण राबविण्यात येणार आहे.

उत्पादन,व्यापार आणि इतर सेवा क्षेत्रांतील असंघटित,बिगर-कृषी आस्थापनांची माहिती या सर्वेक्षणातून संकलित केली जाणार आहे.

'आस्थापना' (Establishment) हे या सर्वेक्षणाचे मूलभूत चौकशी एकक असेल.ASUSE 2026 जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत राबविले जाणार असून उत्पादन,व्यापार आणि व्यापाराव्यतिरिक्त निवडक सेवा क्षेत्रातील सर्व असंघटित बिगर-कृषी आस्थापनांचा त्यात समावेश असेल.

**कोणत्या आस्थापनांचा समावेश**

कारखाना अधिनियमांतर्गत नोंदणीकृत नसलेली उत्पादन आस्थापने,काही विशिष्ट उत्पादन उद्योग,व्यापार आस्थापने,सेवा क्षेत्रातील आस्थापने,स्वमालकी व भागीदारी संस्था,बचत गट,ट्रस्ट, संघटना,क्लब,सहकारी संस्था आणि ना-नफा तत्त्वावरील संस्था यांचा सर्वेक्षणात समावेश करण्यात येणार आहे.

**कोणत्या आस्थापना वगळल्या जाणार**

कंपनी अधिनियमांतर्गत नोंदणीकृत कंपन्या,वार्षिक उद्योग सर्वेक्षणात (ASI) समाविष्ट उद्योग,केंद्रीय विद्युत प्राधिकरणाकडे नोंदणीकृत वीज निर्मिती केंद्रे तसेच शासकीय विभाग,शासकीय कंपन्या,शासकीय संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग या सर्वेक्षणाच्या व्याप्तीबाहेर ठेवण्यात आले आहेत.नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या सर्वेक्षणांमधून मिळणारी माहिती रोजगारविषयक धोरणे,विकास आराखडे, आर्थिक नियोजन आणि राष्ट्रीय लेखा प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे निवडलेल्या कुटुंबांनी, नागरिकांनी आणि आस्थापनांनी सर्वेक्षण पथकांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे,असे आवाहन करण्यात आले आहे.

## १४ जून रोजी १९ परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात निर्बंध ; नियमांचे उल्लंघन केल्यास फौजदारी कारवाई

धाराशिव, (जिमाका) महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ रविवार, १४ जून रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत धाराशिव शहरातील १९ परीक्षा केंद्रांवर होणार असून,या परीक्षेसाठी एकूण ५ हजार २८० परीक्षार्थी प्रविष्ट झाले आहेत.परीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र परिसरात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

धाराशिव येथील श्रीपतराव भोसले हायस्कूल,रामकृष्ण परमहंस महाविद्यालय,छत्रपती शिवाजी हायस्कूल, जिल्हा परिषद कन्या प्रशाला,श्री श्री रविशंकर विद्यामंदिर,विद्यामाता हायस्कूल, तेरणा पब्लिक स्कूल,शासकीय तंत्रनिकेतन,अभिनव इंग्लिश स्कूल, ग्रीनलँड पब्लिक स्कूल,पोदार इंटरनॅशनल स्कूल,टीपीसीटी अभियांत्रिकी महाविद्यालय,भारत विद्यालय, के.टी. पाटील फार्मसी महाविद्यालय, व्ही.जे.शिंदे पॉलिटेक्निक कॉलेज आदी केंद्रांवर परीक्षा होणार आहे.

परीक्षार्थ्यांना कोणताही अडथळा निर्माण होऊ नये तसेच बाह्य हस्तक्षेप टाळण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात विशेष निर्बंध लागू करण्यात आले आहेत.या परिसरात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास, शांततेला बाधा निर्माण करणारी कृत्ये करण्यास तसेच परीक्षा प्रक्रियेत अडथळा आणण्यास मनाई करण्यात आली आहे.

याशिवाय परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर,टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ,कॉम्प्युटर सेंटर,इंटरनेट कॅफे, ध्वनिक्षेपक तसेच तत्सम सुविधा बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मोबाईल फोन,सेल्युलर फोन,फॅक्स, ई-मेल किंवा इतर प्रसार माध्यमांची साधने घेऊन परीक्षा केंद्रात प्रवेश करण्यासही बंदी राहणार आहे.परीक्षेशी संबंध नसलेल्या कोणत्याही व्यक्तीस परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.केवळ परीक्षा केंद्रावर नियुक्त अधिकारी, कर्मचारी,शासकीय कामावरील अधिकारी- कर्मचारी,संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक,कर्मचारी आणि परीक्षार्थी यांनाच प्रवेश असेल.परीक्षार्थ्यांच्या नातेवाईकांनाही केंद्र परिसरात प्रवेश दिला जाणार नाही.

तसेच परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे. परीक्षा केंद्र परिसरात कोणत्याही वाहनांना प्रवेश दिला जाणार नसल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

हे आदेश १४ जून २०२६ रोजी सकाळी ७ ते दुपारी २ वाजेपर्यंत लागू राहणार आहे. परीक्षा सुरळीत आणि शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी हे निर्बंध घालण्यात आले असून,आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २२३ अन्वये गुन्हा दाखल करून फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## काही पक्ष काँग्रेसमध्ये विलिन होणार!

देशपातळीवर भाजपा हा सर्वात मोठा पक्ष समजला जात असताना काही पक्ष काँग्रेसमध्ये विलिन होणार आहेत अशा वावड्या उठविल्या जात आहेत. यात टीएमसी म्हणजे ममता बॅजर्जी यांचा पक्ष विलिन होणार आहेत या बाबत हालचाली सुरू असल्याचे सांगण्यात येते. अस्तित्व टिकविण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी काँग्रेस पक्षात यावे असेही मत श्रीमती सोनिया गांधी यांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे लहान प्रादेशिक पक्षाला काँग्रेसमध्ये सामावुन घेतले जाणार असल्याच्या हालचाली दिसून येत आहेत. त्याच प्रमाणे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीस निमंत्रण देण्यात आल्याचे सांगण्यात येते. मुळात जे काही प्रादेशिक लहान पक्ष आहेत यांचे अस्तित्व राहिले नाही. त्यापेक्षाही मोठी बाब म्हणजे लहान प्रादेशिक पक्षाला यापुर्वी काँग्रेसने मदत केली नाही. निवडणुक काळात मदत अपेक्षित असते ती केली नाही. ज्यावेळी प. बंगालमध्ये निवडणुक प्रक्रिया चालू होती त्यावेळी एकट्या ममता बॅनर्जी ह्या लढत होत्या. त्यावेळी मदत काँग्रेसने कारणे अपक्षित होते त्याच प्रमाणे तामिळनाडूत सुद्धा तसेच धोरण काँग्रेसने स्विकारले. नुकतेच संपुआची बैठक नवी दिल्लीत झाली यावेळी अनेक प्रादेशिक पक्ष उपस्थित होते. यावेळी ममता ह्या काँग्रेसजवळ आल्या. एवढे दिवस त्यांना गर्व होता. तो गर्व, स्वाभिमान आता उरला नाही. भाजपाने प. बंगालमोठा विजय प्राप्त झाल्यावर आता काँग्रेसची आठवण झाली. निवडणुक पुर्व काँग्रेस सोबत निवडणुका लढल्या असत्या तर ममता बॅनर्जी यांना मोठा पराभव पत्कारावा लागला नसता. आता पायाखालची जमीनच घसरली जात असताना कोणाला जवळ करावयाचे आहे हे पाहुन ममता बॅनर्जी ह्या काँग्रेस जवळ येत आहेत. त्याच प्रमाणे भाजपा व संघाला सडेतोड उत्तर देण्यासाठी एकमेव काँग्रेस पक्ष मजबुत असल्याचे मत राहुल गांधी यांनी व्यक्त केले. वास्तविक रालोआकडे आता चारशेच्या जवळ खासदार आहेत. मोठे सर्वाधिक बहुमत आहे. पंतप्रधानाच सुत्र हाती घेतल्यापासून बारावर्ष झाली. नुकतेच त्यांनी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा विक्रम मोडीत काढला आहे. आता पर्यंत सर्वाधिक काळ नेहरू यांनी पंतप्रधानपद भोगले होते. एकंदरीत हालचाली पाहाता भाजपा हा मजबुत पक्ष बनत आहे. देशपातळीवर अनेक राज्य भाजपा व मित्रपक्षाने म्हणून ताब्यात घेतले जात आहे. प्रत्येक वेळी काँग्रेसला मोठा धक्का बसत आहे. काँग्रेसची राज्य भाजपा व मित्र पक्षाने जिंकली असताना काँग्रेसपक्षात काही परिवर्तन करू शकला नाही. आजही काँग्रेसकडे अतिअल्प संख्याबळ आहे. बोटावर मोजण्याइतकी स्टेट आहेत. या बाबीचा विचार करून भाजपाला शह कसे देणार? आता भाजपा ताकदवान पक्ष बनला आहे. काँग्रेसची ताकद कमी पडत आहे. त्यामुळे काँग्रेसने नको तो आव आणून बोलणे टाळले पाहिजे. काँग्रेस बोलून घाण करीत आहे तर भाजपा कामे करून जनतेची मने जिंकत आहे. हा फरक राहुल व प्रियंका गांधी यांनी समजुन घेतला पाहिजे. आता भाजपाला शह देण्यासाठी काँग्रेस पक्ष पुन्हा सक्षम होईल असे वाटत नाही. काँग्रेसला पहिल्यांदा जनतेचा मोठा पाठींबा मिळवावा लागेल. जनतेसोबत राहुन कार्यकर्त्यासाठी चोवीसतास दरवाजे उघडे ठेवावे लागणार आहे. सहज भेटणारे राहुल गांधी आहेत असे सर्वांना वाटले पाहिजे. तसे पाहिले तर संपुआ म्हणजे काँग्रेस सत्तेत असताना देशात काय परिस्थिती होती व आता तुलनात्मक विचार केला तर परिस्थिती सुधारली आहे. देशात दंगली, स्फोट, मोठ्या प्रमाणात घुसखोरी नाही. बॉम्बस्फोटतर बंदच झाले. जातीय दंगली घडविल्या जात नाहीत. वचक बसली आहे. त्यामुळे ठराविक मंडळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शिव्या घालतात. नको ते आरोप केले जात आहेत. कितीही मोदी यांनी केले तरी ते पंतप्रधान मोदी यांना मानणारे नाहीत हे आता उघड दिसून येत आहे. त्यामुळे भाजपावाले या बाबीकडे लक्ष देत नाहीत. आपले काम चालू ठेवत आहेत. गणिमी काव्यानुसार एक-एक राज्य मिळवित आहेत अशा स्थितीत पडीक पक्ष जर काँग्रेसने विलिनीकरण घेतले तर उलट डोकेदुखी वाढणार आहे. ममता बॅनर्जी यांचे काय अस्तित्व उरले आहे. ठराविकांचा लाड करून देशविरोधी कामाची पावती प.बंगालमधील जनतेनी दिली आहे. तसेच महाराष्ट्रात विरोधी पक्षाची काय स्थिती आहे. यात सुधारणा होईल असे वाटत नाही. राष्ट्रवादी शरद पवार गट असो किंवा शिवसेनेचा उद्धव ठाकरे गट असो! त्यांची स्थिती काय दर्शविते. किती जि.प. पंचायत समिती, नगरपरिषदा किंवा महानगरपाहिलका ताब्यात आहेत. राज्य पातळीवर संघटन किती मजबुत आहे याचा पहिल्यांदा विचार केला पाहिजे. काँग्रेसची स्थिती महाराष्ट्रात चांगली नाही. प्रदेशाध्यक्ष चांगले व्यक्ती असले तरी काम करण्यासाठी संघटनशक्ती लागते ती नाही. राज्य प्रदेशाध्यांनी अध्यक्षपद मिळलयनंतर कोणते यश मिळविता आले याचा विचार केला पाहिजे. मुळात मवाळ व्यक्ती हा प्रदेशाध्यक्ष करणे योग्य नाही. महाराष्ट्रात तीन विरोधीपक्ष किंवा गट आहेत. शरद पवार, उद्धव ठाकरे व काँग्रेस यांची राज्यातील स्थिती पाहिली तर काय दर्शविते. याचा विचार पहिल्यांदा करून कौंग्रेसने विलिनीकरून घेतले पाहिजे. उलट काँग्रेसची प्रतिमा डागळणार आहे. ममता बॅनर्जी यांना देशातील जनता पाठींबा देण्यासारखे कोणते काम केले आहे? उलट गोहत्त्यास प्रोहत्सान दिले. घुसखोर पाठबळ दिले. देश पोखरणाऱ्यास मदत केली आहे. हे जनतेला कळून येत नाही का? अशा ममताच्या पक्षाला काँग्रेसमध्ये सामावुन घेवुन काय साध्य होणार आहे. आता तर चार ममताचे खासदार वेगळे होवून वेगळा गट निर्माण करणार आहेत. अनेकजन पक्ष सोडत आहे. ती मालिका चालूच आहे. अशा स्थितीत ममता बॅनर्जी सह पक्षाला काँग्रेस सामावुन घेत असेल तर 'बुडत्याचे पाय खोलात' जाणार आहेत. त्यामुळे काँग्रेसने विनाकरण काहीही बोलून घाण करू नये. संघशक्तीला किंवा भाजपाला टक्कर देण्याएवढी ताकद काँग्रेस नाही तरी ते शह देण्याचे जाहिर विचार व्यक्त करीत आहेत हा बालीश प्रकार आहे. त्यामुळे ज्यांचे अस्तित्त्व उरले नाही त्यांना काँग्रेस पक्षाने आपल्यापक्षात विलिनीकरण करून घेणे अयोग्य आहे.




# चला, पाल्यांना मराठी शाळेत घालू या! प्रवेशासाठी जि.प.च्या शाळा निवडूया!

जून महिना उजाडला की नव्या शैक्षणिक वर्षाची चाहूल लागते. घराघरांत मुलांच्या शाळा प्रवेशाची लगबग सुरू होते. आपल्या पाल्याला कोणत्या शाळेत प्रवेश द्यावा, हा प्रत्येक पालकासमोरील महत्त्वाचा प्रश्न असतो. अशा वेळी एक मराठी माणूस, एक जबाबदार पालक आणि आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगणारा नागरिक म्हणून आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे – 'आपल्या मुलाला जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत प्रवेश का देऊ नये?'

आज आपल्या राज्यातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक, माध्यमिक शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्तम शिक्षक, आधुनिक सुविधा आणि संस्कारक्षम वातावरण यामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहेत. याला आणखी उंचीवर पोहोचविण्यासाठी आवश्यक आहे तो पालकांचा विश्वास! आणि पालक म्हणून आपला सक्रिय सहभाग! केवळ अफवा आणि यंत्रणेसंदर्भातील नकारात्मक दृष्टिकोन यामुळे ग्रामीण भागातील कमी खर्चाची, योग्य गुणवत्तेची आणि संस्कार करणारी एक यंत्रणा आम्ही कमकुवत तर करत नाही ना? हा प्रश्न एकदा स्वतःला विचारणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात आतापर्यंत इतिहास घडवला तो जिल्हा परिषदेच्या शाळांनी या शाळांमधून आजचे उच्चपदस्थ अधिकारी, शास्त्रज्ञ, डॉक्टर, वकील, कवी, लेखक, कृषी तज्ज्ञ, समाज सुधारक तयार झाले आहेत. विशेषतः मराठी माध्यमातून शिकूनही ते कुठेही गुणवत्तेत मागे पडलेले नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण आमच्या अनेक पिढ्यांनी अनुभवले आहे. अपार कष्ट, अवहेलना सहन करून अशा शाळांमधून शिक्षण घेत त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. देशातील मोठमोठ्या संस्थांवरचे गुणवान जिल्हा परिषदेच्या शाळांमधूनच तयार झाले आहे. त्यामुळे आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या आणि विशेषतः जिल्हा परिषद शाळांच्या दारी नेण्याची हीच योग्य वेळ आहे.

**जिल्हा परिषद शाळा : गुणवत्तेची खात्री**

जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची निवड अत्यंत पारदर्शक आणि गुणवत्तेच्या निकषांवर आधारित असते. शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी), विविध स्पर्धात्मक प्रक्रिया, शैक्षणिक गुणवत्ता आणि शासनाने ठरवून दिलेल्या नियमांच्या आधारे शिक्षकांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे समाजातील गुणवंत, प्रशिक्षित युवकच शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांसमोर उभे राहतात. जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या गुणवत्तेची वेळोवेळी तपासणी होते. प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे या शाळांमध्ये अप्रशिक्षित शिक्षक हा प्रश्न निकाली निघाला आहे.

शिक्षक हे राष्ट्रनिर्माते असतात. आपल्या गुरु शिष्य प्राचीन परंपरेला याच शाळा पुढे घेऊन गेल्या आहेत. येथील शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, संस्कारांसाठी, देशाच्या आधुनिक शैक्षणिक धोरणांशी जोडले गेले असतात. त्यामुळे शासकीय शैक्षणिक संस्था अर्थात आपल्या शाळा जबाबदार नागरिक घडविणारी यंत्रणा म्हणून पुढे आल्या आहेत.

**मातृभाषेतून शिक्षण : अधिक आत्मविश्वास देणारे**

शैक्षणिक संशोधन सातत्याने सांगते की, मुलांचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेत झाले तर त्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती आणि सर्जनशीलता अधिक चांगल्या...

# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या शिष्टमंडळाने घेतली राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची सदिच्छा भेट



**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या शिष्टमंडळाने माजी खासदार आणि असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज कोटक यांच्या नेतृत्वाखाली राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी विविध क्रीडा स्पर्धांसाठी युवकांना योग्य प्रशिक्षण मिळण्याबाबत चर्चा झाली.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले, उत्तर-पूर्वेकडील राज्यांतील खेळाडूंमध्ये गुणवत्ता आहे. पायाभूत सुविधांचे महाराष्ट्रात क्रीडा क्षेत्रात चांगल्या पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. महाराष्ट्राने तेथील गुणवान खेळाडूंना महाराष्ट्रात आणून प्रशिक्षण उपलब्ध करुन द्यावे. क्रीडा क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर असून 'एक भारत, श्रेष्ठ भारत' अभियानांतर्गत इतर राज्यांमध्ये विविध खेळांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी महाराष्ट्राने पुढाकार घ्यावा, असे आवाहन राज्यपालांनी केले.

यावेळी महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव संजय शेटे, सहसचिव डॉ. प्रदीप खांडरे, ऑल इंडिया टेनिस असोसिएशनचे महासचिव सुंदर अय्यर, त्रिपुरा ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव तसेच ऑल इंडिया टेनिस असोसिएशनचे सहसचिव सुजित रॉय यांच्यासह विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## बी.एससी. (मेजर केमिस्ट्री) : उज्ज्वल भविष्याकडे नेणारा राजमार्ग

आजच्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात रसायनशास्त्र (Chemistry) हे केवळ प्रयोगशाळेपुरते मर्यादित राहिलेले नाही. अन्न, औषधे, सौंदर्यप्रसाधने, पर्यावरण संरक्षण, न्यायवैद्यक शास्त्र, साखर उद्योग, अल्कोहोल तंत्रज्ञान, औषधनिर्माण उद्योग, संशोधन आणि विविध शासकीय क्षेत्रांमध्ये रसायनशास्त्राचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे बी.एस्सी. मेजर केमिस्ट्री हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी रोजगार, संशोधन आणि उद्योजकतेच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

**शासकीय व निमशासकीय क्षेत्रातील संधी:**

बी.एस्सी. केमिस्ट्री पदवीधरांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC), संघ लोकसेवा आयोग (UPSC), कर्मचारी निवड आयोग (SSC), रेल्वे, संरक्षण विभाग, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग (PSUs) तसेच विविध संशोधन संस्थांमध्ये केमिस्ट्री पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB), केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB), जलसंपदा विभाग, पर्यावरण विभाग आणि सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळांमध्ये विश्लेषक, वैज्ञानिक सहाय्यक व तांत्रिक अधिकारी म्हणून करिअर घडविता येते.

**औद्योगिक क्षेत्रातील मोठी मागणी:**

रासायनिक उद्योग हा भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या उद्योगांपैकी एक आहे. पेट्रोकेमिकल्स, पेंट्स, प्लास्टिक्स, डाईज, खतनिर्मिती, सिमेंट, पॉलिमर्स आणि विशेष रसायने तयार करणाऱ्या उद्योगांमध्ये केमिस्ट्री पदवीधरांना गुणवत्ता नियंत्रण (Quality Control), गुणवत्ता हमी (Quality -ssurance), उत्पादन (Production), संशोधन व विकास (RD) आणि विश्लेषण विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होतो.

**अन्न उद्योगातील करिअर:**

अन्न सुरक्षा आणि गुणवत्ता ही आजची मोठी गरज बनली आहे. अन्न प्रक्रिया उद्योग, दुग्धजन्य पदार्थ, पेये, मसाले, बेकरी उत्पादने आणि पॅकेज्ड फूड कंपन्यांमध्ये फूड ॲनालिस्ट, क्वालिटी कंट्रोल ऑफिसर आणि रिसर्च असोसिएट म्हणून काम करण्याची संधी मिळते. FSS-I सारख्या संस्थांमध्येही रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

**सौंदर्यप्रसाधन उद्योगातील संधी:**

सौंदर्यप्रसाधन उद्योग झपाट्याने विकसित होत असून परफ्यूम, बॉडी मिस्ट, क्रीम, लोशन, शॅम्पू, साबण आणि इतर कॉस्मेटिक उत्पादनांच्या निर्मितीमध्ये रसायनशास्त्राची महत्त्वपूर्ण भूमिका असते. कॉस्मेटिक फॉर्म्युलेटर, उत्पादन अधिकारी, गुणवत्ता नियंत्रण अधिकारी आणि संशोधक म्हणून विद्यार्थी करिअर करू शकतात.

**औषधनिर्माण (Pharmaceutical) क्षेत्र:**

भारत हा जगातील प्रमुख औषधनिर्माता देशांपैकी एक आहे. फार्मास्युटिकल कंपन्यांमध्ये केमिस्ट्री पदवीधरांना विश्लेषण, गुणवत्ता नियंत्रण, औषध संशोधन, उत्पादन आणि नियामक विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळतो. पुढे एम.एस्सी. केमिस्ट्री, फार्मास्युटिकल केमिस्ट्री किंवा संबंधित अभ्यासक्रमाद्वारे संशोधन क्षेत्रातही संधी उपलब्ध होतात.

**न्यायवैद्यक शास्त्र (Forensic Science):**

गुन्हे अन्वेषणात रसायनशास्त्राचा मोठा उपयोग होतो. विषतज्ज्ञ (Toxicologist), फॉरेन्सिक ॲनालिस्ट, क्राईम लॅब वैज्ञानिक अशा पदांवर कार्य करण्यासाठी बी.एस्सी. केमिस्ट्री ही मजबूत शैक्षणिक पार्श्वभूमी ठरते. गुन्हे उकलण्यासाठी रक्त, विषारी पदार्थ, औषधे आणि इतर रासायनिक पुराव्यांचे विश्लेषण करण्याचे कार्य या क्षेत्रात केले जाते.

**साखर उद्योग आणि अल्कोहोल तंत्रज्ञान:**

महाराष्ट्र हा साखर उद्योगात अग्रगण्य राज्य आहे. साखर कारखाने, डिस्टिलरीज आणि इथेनॉल उत्पादन प्रकल्पांमध्ये केमिस्ट्री पदवीधरांना केमिस्ट, प्रयोगशाळा विश्लेषक, गुणवत्ता नियंत्रण अधिकारी आणि उत्पादन अधिकारी म्हणून मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. इथेनॉल आणि जैवइंधन क्षेत्राच्या वाढत्या मागणीमुळे भविष्यात या क्षेत्रात रोजगाराच्या संधी अधिक वाढणार आहेत.

**संशोधन आणि उच्च शिक्षण:**

बी.एस्सी. नंतर एम.एस्सी., पीएच.डी., उडखठ-छएढ, डएढ, ऋ-ढए यांसारख्या परीक्षांद्वारे विद्यार्थी संशोधन व अध्यापन क्षेत्रात करिअर घडवू शकतात. महाविद्यालयीन प्राध्यापक, संशोधक, वैज्ञानिक आणि उद्योग सल्लागार म्हणूनही मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

**उद्योजकतेच्या नव्या संधी:**

आज अनेक तरुण स्वतःचे परफ्यूम, कॉस्मेटिक्स, हँड सॅनिटायझर, क्लिनिंग प्रॉडक्ट्स, अन्नपूरक पदार्थ, प्रयोगशाळा सेवा आणि रासायनिक उत्पादने तयार करण्याचे उद्योग सुरू करत आहेत. बी.एस्सी. केमिस्ट्रीचे ज्ञान उद्योजकतेसाठी भक्कम पाया ठरू शकते.

बी.एस्सी. मेजर केमिस्ट्री हा केवळ पदवी अभ्यासक्रम नसून विविध क्षेत्रांमध्ये करिअरची दारे उघडणारा अभ्यासक्रम आहे. शासकीय, निमशासकीय, औद्योगिक, औषधनिर्माण, अन्न, पर्यावरण, न्यायवैद्यक, साखर उद्योग आणि संशोधन क्षेत्रांमध्ये प्रचंड रोजगार संधी उपलब्ध आहेत. विज्ञानाची आवड, संशोधनाची जिज्ञासा आणि समाजोपयोगी कार्य करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी बी.एस्सी. मेजर केमिस्ट्री हा उज्ज्वल भविष्यासाठी सर्वोत्तम पर्याय ठरू शकतो. म्हणुन केमिस्ट्री निवडा, भविष्य घडवा.

**–प्रा.डॉ. रविंद्र संदीपान शिंदे, रसायनशास्त्र विभाग, दयानंद सायन्स कॉलेज, लातूर**

# धुळे-नंदुरबारला राज्याच्या विकासाचे नवे 'ग्रोथ इंजिन' बनवणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

➤ अण्णासाहेब चुडामण पाटील यांच्या 'अजिंक्य' चरित्रग्रंथाचे प्रकाशन

➤ 'अजिंक्य' चरित्रग्रंथातून संघर्ष, नेतृत्व, राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेची प्रेरणा मिळेल




**मुंबई/प्रतिनिधी:** धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये प्रचंड विकासक्षमता आहे. राज्याच्या विकासाला नवी गती देणारी 'ग्रोथ इंजिन्स' म्हणून या दोन्ही जिल्ह्यांचा विकास करण्याचा शासनाचा निर्धार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

एनसीपीए येथील टाटा थिएटरमध्ये आयोजित माजी खासदार दिवंगत अण्णासाहेब उपाख्य चुडामण पाटील यांच्या 'अजिंक्य' या जीवनचरित्राच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार शोभाताई बच्छाव, आमदार अमरीशभाई पटेल, ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर, सौरभ शुक्ला, विनय सहस्रबुद्धे , कुणाल पाटील, माजी आमदार जयंत पाटील, चित्रा वाघ उपस्थित होते.

**राज्याच्या नव्या विकास आराखड्यात धुळे व नंदुरबारला महत्वाचे स्थान**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, धुळे जिल्ह्याने अनेक दशकांपासून महाराष्ट्राला समृद्ध केले आहे. या भागातील मानवी संसाधने, उद्योग, शिक्षण आणि कृषी क्षेत्रातील क्षमता लक्षात घेऊन राज्याच्या नव्या विकास आराखड्यात या दोन्ही जिल्ह्यांना महत्वाचे स्थान दिले जाणार आहे.

**अण्णासाहेबांचे कार्य म्हणजे परिवर्तनाचा इतिहास**

दिवंगत अण्णासाहेब चुडामण पाटील यांचे जीवन म्हणजे संघर्ष, राष्ट्रनिष्ठा आणि समाजसेवेचा प्रेरणादायी प्रवास असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आर्थिक संकटामुळे गिरणीत नोकरी स्वीकारलेल्या अण्णासाहेबांनी अन्यायाविरोधात लढा उभारला. स्वातंत्र्यलढ्यात मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह आणि 'चले जाव' आंदोलनात सहभाग घेत दोन वर्षांचा कारावास भोगला. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक आणि पंडित नेहरू यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांना स्वतःला शिक्षण घेता आले नाही, मात्र समाजातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी त्यांनी शिक्षण संस्थांची उभारणी केली. शाळा, महाविद्यालये, तसेच पुढे वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण संस्थांचे जाळे उभे राहिले. अण्णासाहेबांनी रोवलेले हे बीज पुढील पिढ्यांनी जोपासत मोठा विस्तार घडवून आणल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

**लोकांच्या मनावर राज्य करणारे 'अजिंक्य' नेतृत्व**

अण्णासाहेब सलग तीन वेळा लोकसभेवर निवडून आले. मात्र 'अजिंक्य' ही उपाधी त्यांना केवळ निवडणूक विजयांमुळे मिळालेली नाही. शिक्षण, सहकार, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी उभारलेले कार्य, जोडलेली माणसे आणि लोकांच्या मनात निर्माण केलेला विश्वास हेच त्यांच्या अजिंक्यत्वाचे खरे कारण असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**चांगल्या कार्याचे दस्तावेजीकरण काळाची गरज**

समाजात आदर्श निर्माण करणाऱ्या व्यक्तींचे कार्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्याचे दस्तावेजीकरण होणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. 'अजिंक्य' हा चरित्रग्रंथ केवळ अण्णासाहेबांच्या जीवनाचा आलेख नसून धुळे जिल्ह्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय इतिहासाचाही महत्त्वपूर्ण दस्तावेज आहे, असे त्यांनी नमूद केले.

**धुळे ही 'नररत्नांची खाण'**

धुळे जिल्ह्याने विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणारी अनेक व्यक्तिमत्वे महाराष्ट्राला दिली आहेत. या जिल्ह्यातील क्षमता आणि कर्तृत्व पाहता हा जिल्हा 'नररत्नांची खाण' असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. आमदार अमरीश पटेल यांच्यासारख्या उद्योजकांनी ग्रामीण भागात उभे केलेले विकास मॉडेलही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

**भावी पिढ्यांना प्रेरणा देणारा ग्रंथ**

'अजिंक्य' या चरित्रग्रंथातून संघर्ष, नेतृत्व, राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेची प्रेरणा मिळेल. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी इच्छाशक्ती, दूरदृष्टी आणि समाजहिताची भावना असेल तर मोठे परिवर्तन घडविता येते, हा संदेश अण्णासाहेबांच्या जीवनातून मिळतो. त्यामुळे हा ग्रंथ धुळे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील युवकांसाठी प्रेरणास्रोत ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुणाल पाटील यांनी केले.यावेळी लेखकाच्या पत्नी इंदुमती सोमनाथ पाटील यांचा मुख्यमंत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# नव्या गरजा, नव्या संधी

थकलेली माणसे : विजय तरवडे

समाजातील एका घटकाची गरज ही, दुसर्या घटकासाठी संधी असू शकते. गरज व्यवस्थित भागली जावी. ज्या घटकासाठी ती संधी असेल, त्या घटकाने गैरफायदा घेऊ नये, या उद्देशाने खालील मुद्दे मांडत आहे.गेल्या दोन-तीन दशकात नोकर्या आणि रोजगारांचे स्वरूप बदलत गेले. त्यामुळे नोकरीला लागलेल्या तरुण-तरुणीना आईवडिलांसोबतच राहणे हळूहळू अवघड होत गेले. नोकरदार युवा वर्ग घराबाहेर-गावाबाहेर-देशाबाहेर जाऊ लागला. पन्नाशी-साठीतले आईवडील मागे राहू लागले. पूर्वी एका कुटुंबाचे एका घरात भागत होते. आता त्यांना दोन घरे लागू लागली.

विज्ञानाच्या प्रगतीमुळे समाजातील सर्वांचे सरासरी आयुर्मान वाढले. ऐंशी ते नव्वदच्या घरातील आईवडील आणि साठी-सत्तरीतली अपत्ये अशी कुटुंबे तयार झाली. यांनी एकत्र राहायचे ठरवले तरी, घरात अतिज्येष्ठ आईवडील आणि सेवानिवृत्त मुले असतील तेव्हा आईवडील आजारी पडल्यास त्यांची शुश्रूषा करणे साठीतल्या मुलांना अवघड जाऊ लागले.

यातून अतिज्येष्ठ नागरिकांच्या काही नव्या गरजा निर्माण झाल्या. मुले जवळ नसताना घरात एकटे राहणार्या आईवडिलांच्या गरजा म्हणजे- रोजचा बाजारहाट, बँकेची कामे, इतर आवश्यक कामे वगैरेसाठी बाहेर पडताना मदत लागते. दवाखान्यात किंवा रुग्णालयात जाताना सोबत लागते. एखादी व्यक्ती अंथरुणाला खिळलेली असेल तर मसाज, फिजिओथेरपी, नैमितिक मलमपट्टी वगैरेसाठी परिचारक किंवा परिचारिकेची गरज पडते.

यापूर्वी, आरोग्यविषयक तक्रारींसाठी जास्तीत-जास्त फॅमिली डॉक्टरना घरी बोलावले जाई. आता फॅमिली डॉक्टर्स फारसे उरलेले नाहीत. पूर्वी परिचारिकेला घरी बोलवण्याची विशेष गरज नव्हती. आता बेड सोअर्सवर इलाज, इन्शुलिन आणि इतर इंजेक्शन्स देणे आणि अन्य कारणांसाठी परिचारिकांची मोठी गरज निर्माण झाली आहे. अतिज्येष्ठ वयोगटातील पती-पत्नी घरात एकटेच असतील तर, डॉक्टरांनी सांगितलेली औषधे व



गोळ्या नीट ठेवणे, वेळेवर घेणे त्यांना शक्य असतेच असे नाही. दिवसांतून ठराविक वेळी हे कोणीतरी करावे लागते, अद्याप अशी सेवा सहजी आणि माफक दारात मिळत नाही. त्यासाठी ओळखीपाळखीच्या व्यक्तींवर अवलंबून राहावे लागते. केअरटेकर्स किंवा मदतनीस महिला-पुरुष उपलब्ध करणार्या 'ब्यूरोज' तयार झाल्या आहेत. अपघात वगैरे प्रसंगी तात्पुरती गरज असेल तेव्हा, केअरटेकर्सची सेवा सोयीची पडते. मात्र, कायमस्वरूपी मदतनीसाची गरज असेल तेव्हा, त्यांचे दर प्रत्येक कुटुंबाला परवडतीलच असे नाही. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना दिवसांचे चोवीस तास मदतनीसाची गरज असेल तर, हे दर श्रीमंत कुटुंबालाच परवडू शकतील. शिवाय, चोवीस तास घरात राहणारी मदतनीस व्यक्ती विशेष विश्वासू असायला हवी.

बाजारहाट करताना, बँकेत जाताना, दवाखान्यात जाताना सोबत लागते. अशी सोबत हल्ली काही सेवाभावी व्यक्तींनी-संस्थांनी मोफत/सशुल्क देऊ केलेली दिसते. पण, याचे नेमके प्रमाणीकरण झालेले दिसत नाही. विशेषतः बँकेतले पेन्शनचे अथवा अन्य व्यवहार करताना विश्वासू सोबत लागते.

अतिज्येष्ठ नागरिकांच्या गरजा फक्त भौतिक स्वरूपाच्या नसतात. काही भावनिक गरजा देखील असतात. 'संध्याछाया' (जयवंत दळवी) किंवा 'नटसम्राट' (कुसुमाग्रज) सारख्या कलाकृती अशा एकाकी वृद्धांच्या काही गरजांचे दर्शन घडवतात. अतिज्येष्ठ नागरिकांची एक समस्या म्हणजे त्यांना त्यांचे बोलणे ऐकून घेणारा श्रोता हवा असतो. या वयात पती-पत्नी एकमेकांशी बोलण्याइतकेच त्रयस्थ श्रोत्याशी बोलायला उत्सुक असतात. अनेकदा ही मंडळ तेच-तेच बोलतात, असंबद्ध बोलतात. पण, हे बोलणे न कंटाळता ऐकून घेणारा असेल तर, त्यांना बरे वाटते. ऐकायला-बोलायला कोणीच नसेल तर, डिमेंशियासारखा आजार बळावू शकतो. डिप्रेशन आल्यासारखे वाटू लागते. पुण्यासारख्या शहरात अनेक सेवाभावी मध्यमवयीन-पन्नाशीसाठीतल्या व्यक्ती अशा एकाकी अतिज्येष्ठ नागरिकांना भेटून तासभर गप्पा मारण्याची 'सेवा' देतात. काहीजण यासाठी नाममात्र म्हणजे पेट्रोलपुरते पैसे घेतात. काहीजण रीतसर शुल्क आकारतात.

थोडक्यात, सांगायचे तर नव्या समाजरचनेत अतिज्येष्ठ नागरिकांच्या काही नव्या गरजा उद्भवल्या आहेत. त्या भागवण्यासाठी तीन प्रकारच्या सेवांची आवश्यकता आहे. लहानसहान कामांसाठी दिवसभरातली सोबत देणारी व्यक्ती, शुश्रूषेसाठी परिचारक-परिचारिका आणि दिवसातून काही वेळ गप्पा मारण्यासाठी सोबत. या तिन्ही सेवा मिळायला सुरुवात झाली आहे; पण त्यांचे प्रमाणीकरण झाले, विश्वासार्हता वाढली आणि शुल्क आकारणीला नेमकी शिस्त आली तर, शहरात वेगळ्या प्रकारचे रोजगार निर्माण होतील. केरळ राज्यात मदतनीस व्यक्तींना विशेष प्रशिक्षण उपलब्ध होत आहे. आपल्याकडील ब्युरोंमध्ये मदतनीस महिलांना जुजबी वैद्यकीय माहिती-प्रशिक्षण प्राप्त झाले तर त्यांच्या सेवांची गुणवत्ता वाढू शकेल.

# हे थांबवायचं कसं...

'इथे बालकामगार काम करत नाही', अशी पाटी हॉटेलसह प्रत्येक कार्यालयात लावली जाते. परंतु, आज आपल्याला अनेक ठिकाणी बालकामगार आढळतात. भाजी विक्री, चहाची टपरी, लहान हॉटेल, कारखाने, खाणी, कॅटरिंग व्यवसाय, दुकाने, बसस्थानक, रेल्वेस्टेशन तसेच रस्त्यांवर फुगे, फुलं, गार्बेज बॅग, पेन किंवा इतर वस्तूंची विक्री करताना लहान मुले दिसतात. या बालकांच्या शिक्षणाचं काय? त्यांचं बालकामगार होणं, थांबवायचं कसं?

बालमजुरीच्या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी १२ जून हा 'जागतिक बाल मजुरी विरोधी दिन'(ौश्रव वरू रसरळपीीं लहळश्रव श्ररलेीी) म्हणून जगभरात साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने २००२ मध्ये हा दिवस सुरू केला. '९ठशव लरीव ीं लहळश्रव श्ररलेीी: ऋ्रळी श्रिरू षीं लहळश्रवीशप, वशलशपीं ीज्ञ षीं रर्वीश्रीी' ही या वर्षीची संकल्पना आहे.

आज समाजात गुन्हेगारीचं प्रमाण वाढतच आहे. याचं मूळ कारण सुशिक्षिततेचा, संस्कारांचा अभाव. हे असं का घडतं? याच्या मुळाशी गेल्यावर लक्षात येतं की, ज्या वयात या मुलांच्या हातात पुस्तके असायला हवीत, त्या वयात मुलांना मजुरी करावी लागते. शिक्षणाअभावी चांगले विचार त्यांच्यापर्यंत पोहचत नाहीत. काय चूक काय बरोबर? योग्य अयोग्य याची समज त्यांना येत नाही. मग हीच मुलं मोठी झाली की, त्यांच्या हातून विचारांअभावी गुन्हा घडतो. त्यांच्यात विकृती निर्माण होते.

बालकामगार वाढण्याचे मुख्य कारण गरिबी आहे. यामुळे मुलांना अभ्यास सोडून पैसे मिळवण्यासाठी कामाची निवड करावी लागते. अनाथ मुले, कुटुंबातील सदस्यांची बेरोजगारी किंवा अत्यल्प



उत्पन्न, पालकांमध्ये शिक्षणाचा अभाव त्यामुळे मुलांच्या शिक्षणाचे महत्त्व न समजणे, सक्षम नसलेल्या शासकीय योजना याशिवाय घरातील वादविवादाला कंटाळून अनेक मुलं घर सोडून पळून जातात व बाहेर कामे करू लागतात, अशी बालमजुरीमागील अनेक कारणे आहेत.

महिला व बालकल्याण विभागाकडून या मुलांचे नाव शाळेत घातले जाते. परंतु ही मुले शाळेत येत नाहीत. ते एका जागी नसतात, कामासाठी सतत स्थलांतर करत असतात. गुन्हेगारी रॅकेटमुळे अनेक मुलांना बालकामगार होण्यास भाग पाडले जाते. इच्छा नसतानाही अनेक लहानग्यांचं भविष्य असं कुरतडलं जातं. हा प्रकार कुठेतरी थांबावा, यासाठी प्रशासनाने काहीतरी ठोस अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. एकीकडे देश तंत्रज्ञानात इतकी प्रगती करत आहे आणि या लहाग्यांना मात्र शिक्षणाचा गंधही नाही. या मुलांना न्याय का मिळू नये? इतर मुलांच्या हातात पाटी पेन्सिल बघून ही निरागस बालके स्वत:च्या हातांकडे पाहून म्हणत असतील...ही तफावत का?

हथेली पे रेखायें है  अब अधुरी...

# सर्वांचे उच्चार स्वातंत्र्य वाचले

भाजपला २०१९ मध्ये पुन्हा सत्ता मिळाल्यानंतर 'न्यूज क्लिक'वर कारवाई झाली हा योगायोग नाही. आमच्या विरुद्ध बोलल्यास काय होऊ शकेल याचा भीती पसरवणारा संदेश त्यातून सर्व स्वतंत्र विचारांच्या व्यक्तींना दिला गेला होता.

'न्यूज क्लिक' ही डिजिटल वृत्त वाहिनी व त्या व्यासपीठाचे संस्थापक यांच्या विरुद्ध दाखल केलेला गुन्हा दिल्ली उच्च न्यायालयाने रद्द ठरवला आहे. दिल्ली पोलिसांच्या 'आर्थिक गुन्हे शाखेने'(इकॉनॉमिक ऑफेन्स विंग)२०२० मध्ये हा गुन्हा दाखल केला होता. 'हा कायद्याचा गंभीर गैरवापर आहे' असे ताशेरे न्यायालयाने पोलिस व अंमलबजावणी संचालनालय (ईडी) यांच्यावर हे प्रकरण रद्द करताना ओढले आहेत. गुन्हेगारी स्वरूपाचा विश्वास-घात, फसवणूक, गुन्हेगारी स्वरूपाचे कारस्थान, थेट परकीय गुंतवणुकीच्या नियमांचे उल्लंघन अशा 'गुन्ह्यां'साठी ही वृत्तवाहिनी व तिचे संस्थापक-संपादक परबीर पुरकायस्थ यांच्याविरुद्ध प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) किंवा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खेरीज, आर्थिक गैरव्यवहाराच्या संशयावरून ईडीने न्यूजक्लिक व पुरकायस्थ यांच्यावर कारवाई सुरू केली होती. ती देखील न्यायालयाने रद्द ठरवली. 'ही कारवाई म्हणजे वृत्तपत्र स्वातंत्र्य व निष्पक्षपाती पत्रकारिता यांच्यावरील हल्ला आहे' या निरीक्षणातून न्यायालयाने ईडीवर कोरडे ओढले आहेत. या एफआयआरमधून गुन्हा झाल्याचे तसूभरही दिसत नाही असे न्यायालयाने म्हटले आहे. ही निरर्थक कारवाई सूडबुद्धीने व पत्रकारांत दहशत पसरवण्यासाठी झाल्याचे या निकालावरून स्पष्ट होते.

टीका दडपणे हा हेतू

आर्थिक गुन्हे शाखेच्या 'एफ आय आर'च्या आधारे 'आर्थिक गैर व्यवहार प्रतिबंधक कायदा' या कठोर कायद्याद्वारे ईडीने २ सप्टेंबर २०२० रोजी तक्रार दाखल केली आणि २०२१ च्या फेब्रुवारी मध्ये न्यूज क्लिकच्या कार्यालयावर व इतर ठिकाणांवर छापे घातले होते. २०२३ च्या ऑक्टोबरमध्ये पुन्हा अशी 'तपासणी' दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेने




केली. तेव्हा कार्यालयातील संगणक, न्यूजक्लिकचे कर्मचारी, त्यांच्याशी संबंधित व्यक्ती यांचे मोबाईल फोन, लॅपटॉप आदी ४८० इलेक्ट्रॉनिक उपकरणे त्यांनी ताब्यात घेतली होती. 'सुमारे दीड वर्ष ईडीने व्यापक तपास करूनही गुन्ह्याच्या आरोपाची 'कुजबुज'ही आजपर्यंत सापडलेली नाही' असे मत नोंदवून फसवणूक आणि गुन्हेगारी स्वरूपाचा विश्वासघात हे गुन्हे सिद्धच होत नसल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. परदेशी कंपनीचे अधिकारी व पुरकायस्थ यांच्यातील करार हा गुन्हेगारी स्वरूपाचे कारस्थान यासाठी आधार ठरत नाही असेही न्यायालयाने नमूद केले आहे. पुरकायस्थ व परदेशी कंपनी यांच्यात २०१८-१९ या काळात व्यवहार झाला होता. त्या काळात डिजिटल माध्यमांतील थेट परकीय गुंतवणुकीवर निर्बंध नसल्याचे माहिती व नभोवाणी खात्याने तेव्हा स्पष्ट केले होते. रिझर्व बँकेनेही या व्यवहारात कोणताही गैरप्रकार झाला नसल्याचा निर्वाळा दिला होता. कारवाईच्या हेतूवर त्यामुळे संशय निर्माण होतो. आपल्या विरुद्धचा 'एफ आय आर' रद्द करण्याची मागणी करणारा अर्ज 'न्यूज क्लिक'ने सादर  केला होता, त्यात याचे उत्तर आहे. 'राष्ट्रीय महत्त्वाच्या मुद्द्यांवर केले जाणारे स्वतंत्र व निष्पक्षपाती वार्तांकन दडपणे व पत्रकारांसह विविध व्यक्तींचा उच्चार स्वातंत्र्याचा त्यांचा हक्क नाकारणे यासाठी भीतीचे वातावरण निर्माण करणे हा या कारवाई मागचा उद्देश आहे' अशा आशयाचे निवेदन या अर्जात आहे. न्यूज क्लिक २००९ मध्ये स्थापन झाले. त्यांनी तत्कालीन 'युपीए' सरकारवरही टीका केली होती, पण त्यांनी काही कारवाई केली नव्हती. सरकारी धोरणे व कार्यक्रम यांच्यातील दोषांवर न्यूजक्लिक टीका करता असते. मोदी सरकारला टीका आवडत नाही. अशा व्यक्ती व संस्था देशविरोधी असल्याचा या सरकारचा व संघ परिवाराचा समज आहे. सरकारवर टीका करणारी केरळम मधील 'मिडिया वन'ही दूरचित्रवणी वाहिनी त्यांनी बंद केली होती. न्यूजक्लिक वरील कारवाई वर 'रिपोर्टर्स विदाउट बॉर्डर्स' या आंतरराष्ट्रीय संस्थेनेही नाराजी व्यक्त केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांच्या सरकारचा सर्व माध्यमांनी केवळ 'उदो उदो' करावा अशी त्यांची अपेक्षा आहे. गेले दशकभर देशात उच्चार व वृत्तपत्र स्वातंत्र्य धोक्यात आहे. मात्र न्यायालयाने पुन्हा एकदा या मूलभूत हक्कांचे रक्षण केले आहे.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




ज्स्ट्रॉबेरी, करवंदे, रास्पबेरी या सारख्या फळांमध्ये फायटोकेमिकल्स मुबलक मात्रेमध्ये असतात. ही बुद्धीवर्धक असून, स्मरणशक्ती तल्लख ठेवणारी आहेत. ब्रोकोलीमध्ये असणारे सल्फोराफेन हे तत्व मेंदूची शिथिलता दूर करण्यास सहायक आहे. याममध्ये असलेले फोलिक ॲसिड मेंदू सक्रीय राहण्यास मदत करणारे असून, त्यामुळे अल्झायमर्स सारख्या व्याधींचा धोका पुष्कळ अंशी कमी होतो.भोपळ्याच्या बियांमध्ये झिंक मुबलक मात्रेमध्ये असून, हा क्षार बुद्धीवर्धक आणि स्मरणशक्ती तल्लख करणारा आहे.

## २ Joke — विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू - माझ्याच वयाचे आहेत.
बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message — संदेश




Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game kheltehо?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought — सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.- **डॉन प्याट**


**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रियः॥**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



**आडवे शब्द**

१. कातीव दगड
३. नेहमी पटकन विसरणारा
६. वाडवडील
१०. आरडाओरडा, दंगा
१२. दोस्त
१३. व्याह्यांची बायको
१४. अयोध्येची नदी
१६. दाट, निबीड
१८. पृथ्वी
२०. उत्साह
२१. हे खाऊन रूप येते का?
२३. किडा
२५. वाईट सवय
२७. अस्थी
२९. अंत:करण
३१. पराक्रमी पुरुष
३२. आदरणीय
३३. दरवाजा
३५. कापड इ.चा पृष्ठभाग
३६. तृण
३८. आच, उष्णता
३९. घर
४०. मातीच्या भांड्याचा तुकडा
४१. वरणाची दाळ
४२. निर्दय
४३. उद्यान
४४. जवळीक, मैत्री
४७. स्वीकृत, अंगीकृत
५०. अप्रिय, न आवडणारा
५१. सुळका
५१अ. अफवा, वदंता
५२. बालीश
५४. भगिनी
५५. पुष्कळ
५७. तंग
५८. क्रीडा
५९. वेखंड
६०. कुरडईच्या जोडीने तळला जाणारा पदार्थ
६१. बाण
६३. बंध
६४. विलंब
६५. टिंगल
६६. कायद्याला या हजार असतात!
६९. चकित नजर
७१. लाह्यांचा होम
७४. बासरी
७५. चुलता
७७. उणे
७८. न टाळण्याजोगे
७९. बरोबरीचा
८०. शर्विलक
८१. झेप
८३. घोडा
८४. पुष्पगुच्छ
८५. खेळातील चाल
८६. आईचा भाऊ
८७. गगन
८८. रहायला घर नसलेला

**उभे शब्द**

१. दिवा (हिंदी)
२. वेडावाकडा
४. यज्ञातील सरपण
५. निशा
६. अस्तनी
७. नातवंडाचा मुलगा
८. राष्ट्र
९. वारा
१०. डिंक
११. ताजे, तरतरीत
१३. स्वच्छ, निर्मळ
१५. रूधिर
१७. फांदी
१९. सेपे
२२. डोंगर
२४. मसाल्याच्या पदार्थातील एक
२६. धीर, बळ, उत्साह
२८. व्याकूळ, व्याकूळ करणारे
२९. बंदुकीची गोळी
३०. विश्व
३४. गंध, परिमळ
३५. एक 'बोलका' पक्षी
३७. रंग
३८. अटकसत्र
३९. कोडगा
४०. संसद सदस्य
४३. वक्रता
४५. मीठ
४६. वार्धक्य
४८. भेग
४८अ. उगाळलेल्या औषधाचा ओढा
४९. आगेकूच
५०. '... म्हणते रे गीत, परि सारे हलक्याने, आड येते रीत'
५२. पोळ्या करण्याचे साधन
५३. मिठी
५४. नोकर
५७. गृह
६१. लाज
६२. परिचय
६५. सूत कातण्याचे साधन
६७. आक्रोश
६८. हट्ट
७०. घट्ट दह्याची वडी
७२. अग्नी
७३. रगेल, माजखोर
७६. चोळीचा एक प्रकार
८१. पार्वती
८२. एक अप्सरा
८३. सध्या संकटात सापडलेला वन्य प्राणी

**आडवे उत्तर**

१.चिरा ३.विसराळू ६.बापजादे १०.गोंगाट १२.मित्र १३.विहीण १४.शरयू १६.गडद १८.वसुधा २०.जोम २१.तूप २३.कीटक २५.लत २७.हाड २९.काळीज ३१.वीर ३२.वंद्य ३३.कवाड ३५.पोत ३६.गवत ३८.धग ३९.निवास ४०.खापर ४१.तूर ४२.क्रूर ४३.बाग ४४.घसट ४७.पतकरलेले ५०.नावडता ५१.कडा ५१अ.गप ५२.पोरकट ५४.बहीण ५५.रगड ५७.घट्ट ५८.खेळ ५९.वचा ६०.पापडी ६१.शर ६३.पाश ६४.उशीर ६५.टर ६६.पळ-वाट ६९.टकमक ७१.लाजाहोम ७४.वेणू ७५.काका ७७.वजा ७८.अटळ ७९.तुल्य ८०.चोर ८१.उडी ८३.वारू ८४.झेला ८५.खेळी ८६.मामा ८७.आभाळ ८८.बेघर

**उभे उत्तर**

१.चिराग २.डोंगा ४.समिधा ५.रात्र ६.बाही ७.पणतू ८.देश ९.वायू १०.गोंद ११.टवटवीत १३.विमल १५.रक्त १७.डहाळी १९.सुकर २२.पहाड २४.लवंग २६.तकवा २८.कातर २९.काडतूस ३०.जग ३४.वास ३५.पोपट ३७.वर्ण ३८.धरपकड ३९.निगरगट्ट ४०.खासदार ४३.बाक ४५.लवण ४६.म्हातारपण ४८.तडा ४८अ.लेप ४९.वाटचाल ५०.नाही कशी म्हणू तुला ५२.पोळपाट लाटणे ५३.कव ५६.गडी ५७.घर ६१.शरम ६२.ओळख ६५.टकळी ६७.टाहो ६८.हेका ७०.कवडी ७२.जाळ ७३.मगरूर ७६.काचोळी ८१.उमा ८२.रंभा ८३.वाघ




# कशी नशीबानं थट्टा....

जाब विचाराया गेला, तिने केला डाव
भोवर्यात शृंगाराच्या सापडली नाव
त्याच्या पतंगाची दोरी तिने तोडली
खुळ्या जीवा कळला नाही, खोटा तिचा खेळ
तपोभंग झाला त्याचा, पुरा जाई तोल
त्याला कुत्र्या-मांजराची दशा आणली
कशी नशीबानं थट्टा आज मांडली !

राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या पिंजरा (१९७२) या मराठी चित्रपटाच्या कथानकाचे सार कथन करणार्या गीताच्या दोन कडव्यांमधील शोकांतिकेचं मूळ ढक्रए इङणए एछत्र्ख्रएङ' (१९२९) या जर्मन चित्रपटात अनुभवता येते.

जर्मनीतील वायमार शहरात उच्च माध्यमिक शाळेत प्रा. राथ इंग्रजी साहित्य हा विषय शिकवत असतात. कडक शिस्तीचे अन् वेळेचे पक्के असल्याने त्यांचा विद्यार्थ्यांच्यात दहशतयुक्त दरारा असतो. बरोबर आठच्या ठोक्याला वर्गात येत आपल्या खास शैलीत शिकवण्याचं काम करतात; पण तेथील तरुण विद्यार्थी सतत खोडसाळपणा करत असल्यामुळे वरचेवर शिक्षा करावीच लागते.

एकदा प्रा. राथ एका विद्यार्थ्याला 'द ब्लू एंजल' नामक स्थानिक मदिरालयातील मुख्य गायिका व कॅबरे नर्तिका 'लोला' हिचे अश्लिल छायाचित्र वर्गात आणून, बाकी विद्यार्थ्यांना बहकावल्याबद्दल शिक्षा करतात. नंतर त्यांना समजते की, त्या मदिरालयात रोज रात्री काही विद्यार्थी जातात. त्यांना रंगेहाथ पकडण्यासाठी ते त्याच रात्री तिथे जातात आणि काही विद्यार्थी सापडतातही; पण त्यांचा पाठलाग करत असतानाच, रंगमंचामागे त्यांना लोला दिसते अन् तिच्या सौंदर्याने मोहीत होतात. तरीही ते तिला मुलांना असं बहकावू नकोस असं सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न करतात. तिला काहीच फरक पडत नाही. ती त्यांच्यापुढेच आपला पोशाख बदलून निघून जाते. परंतु, लपून बसलेला विद्यार्थी तिचे अंतर्वस्त्र राथ यांच्या कोटाच्या खिशात कोंबता आणि ते घरी परततात.आता लोलाच्या सौंदर्याची मोहिनी त्यांच्या मनावरुन उतरलेली नसल्याने दुसर्या रात्री तिची अंतर्वस्त्रे परत करण्यासाठी ते पुन्हा मदिरालयात जातात. तिथे एका लंपट ग्राहकापासून लोलाचे रक्षण करण्यासाठी त्यांना थोडे आक्रमक व्हावे लागते. या धाडसाच्या बदल्यात लोला त्यांच्यासाठी रंगमंचावरून प्रेमाचे गाणे गाते. परिणामी दुसर्या दिवशी सकाळी राथ लोलाच्या बिछान्यावरुनच जागे होतात. मग लोला त्यांना छानसा नाश्ता भरवून चुंबनाने त्यांची पाठवणी करते. तोपर्यंत जे कधीही घडले नाही ते घडते. त्यांना शाळेत पोहोचायला उशिर होतो.

आता प्राध्यापक स्वतः 'द ब्लू एंजल'मध्ये जात असल्याने विद्यार्थी त्यांची उघडपणे व्यंगचित्राने खिल्ली उडवू लागतात. वर्गातील गोंधळ गदारोळामुळे प्राचार्य वर्गात येतात. व्यंगचित्र पाहून ते मामला ओळखतात अन् पुढील तमाशा टाळण्यासाठी राथ यांना राजीनामा मागतात. लोलाच्या प्रेमात अंध प्रा. राथ प्रतिवाद न करता राजीनामा देतात. आणि थेट लोलाशी विवाह करुन तिच्याबरोबरच राहू लागतात.

लोला आणि नर्तिकांचा संच एका शहरातून दुसर्या शहरात जाणारा फिरता असल्याने राथदेखील त्यांच्याबरोबरच जातात. मात्र त्यांचे लोलाप्रेमाचे सुख फार काळ टिकत नाही; कारण त्यांना लोलाचं बाहुलं म्हणूनच अत्यंत अपमानजनक जीणं जगावं लागतं. सुरुवातीला लोला तिची अश्लिल छायाचित्रे ग्राहकांना विकते याचा ते विरोध करतात. परिणामी त्यांनाच ती ग्राहकांना विकण्यास सांगते. छायाचित्रांवरच्या अश्लिल टिप्पण्या मन मारुन ऐकाव्या लागतात. काळाच्या ओघात त्यांची अधोगती होऊन लोलाच्या मंडळात विदूषक बनून लोकरंजन करावं लागते.

अशा लाचार जीवनात 'सार्वजनिक लोला' च्या व्यवसायामुळे आलेली असुरक्षितता अखेरीस त्यांना मत्सराने ग्रासून टाकते. वेळोवेळी विरोध करण्यामुळे लोला आणि इतर सदस्य त्यांचा चेष्टा मस्करीतून हळूहळू अनादर करु लागतात. असे करता करता पाच वर्षांनी ते मंडळ पुन्हा 'द ब्लू एंजेल'मध्ये जाणार असते. तिथे जाण्यास राथ विरोध करतात. पण त्यांच्या मताला आणि मनाला काहीच किंमत नसते. 'आता लोला सोबत प्रा. राथ'




अशी त्यांच्याच शहरात जाहिरात होते. तेव्हा या माजी प्राध्यापकाला विदूषकाची भूमिका करताना पाहण्यासाठी 'द ब्लू एंजल'मध्ये तुडुंब गर्दी जमते. त्याचवेळी एक तरुण श्रीमंत मासेपा अन् लोला यांचा प्रेमालाप बघून राथ यांचे डोके सणकते. ते रंगमंचावर जाण्यास नकार देतात. परंतु त्यांना विदूषकी प्रवेश घेण्यास भाग पाडले जाते. रंगमंचावर होणार्या थट्टेपेक्षा पडद्यामागील लोलाचे मासेपाच्या बाहुपाशात जाऊन चुंबणे अधिक अपमानजनक वाटून त्यांचा स्वतःवरील ताबा सुटून ते मासेपाला मारायला जातात. लोलाचा गळा दाबू लागतात. शेवटी त्यांना जेरबंद केले जाते. म्हणून, त्याच रात्री उशिरा, हे नाकारलेले, अपमानित, निराधार प्रा. राथ विमनस्क अवस्थेत त्यांच्या शाळेतील आपल्या वर्गात जातात. शाळेचा शिपाई त्यांच्या पाठोपाठ वर्गात जाऊन बघतो, तेव्हा एकेकाळी शिकवत असलेल्या खुर्चीवर बसून टेबलाला कवटाळलेल्या स्थितीत आपले प्राण त्यागलेले प्रा. राथ त्याला दिसतात. १९०५ च्या हेनरिक मान यांच्या 'प्रोफेसर अनरॅट' या कादंबरीवर आधारित पटकथेवर विख्यात जर्मन दिग्दर्शक जोसेफ व्हॉन स्टर्नबर्ग यांनी दिग्दर्शित केलेला हा जर्मन भाषिक पूर्ण लांबीचा 'पहिला बोलपट' असला तरीही मूकपटाप्रमाणे अनेक प्रसंग शब्दाविना प्रभावी ठरलेत.

यातील पहिलाच प्रसंग. प्रा. राथ घरी नाश्ता करण्यापूर्वी घरातील पिंजरा उघडून बघतात तर लाडका पाळीव पक्षी मरुन पडलेला दिसतो. नोकराणी निर्विकारपणे त्याला कचर्याच्या डब्यात टाकते. कितीही लाडाचे असलात तरी पिंज-यात जीव गुदमरतोच. तीच पुढे घडणार्या राथ यांच्या परवडीची नांदी असते.

याच चित्रपटाच्या प्रेरणेने व्ही. शांताराम यांनी 'पिंजरा' ही अजरामर कलाकृती बनवली असली तरी ती त्यांनी पूर्णपणे मराठी मातीत घोळवून सादर केली. त्यात त्यांनी सूडाची फोडणी देऊन नाट्यमय स्वादीष्टता आणली असली तरी, मूळ कलाकृतीत पूर्णपणे राथ यांच्याच 'कर्मसोहळ्याची यात्रा' पहायला मिळते आणि लोला आपल्या पेशाशी प्रामाणिक दिसून येते.

गायिका अभिनेत्री मेर्लिन डिट्रीचच्या 'लोला'ने पदार्पणातच शतक ठोकून आपल्या सौंदर्याने पुढील सात दशके चित्ररसिकांना घायाळ केले. कारण तिच्या फॉलिंग इन लव्ह अगेन, कांट हेल्प इट या गीताची मधूर धुंदी अजूनी ओसरलेली नाही. तरीही कोवळ्या कळीच्या सौंदर्यावर भाळणार्या भुंग्यापेक्षा ज्योतीच्या ज्वालेत होरपळणार्या पतंगाच्या अंताने मनाला जास्त वेदना होतात. अगदी तशाच भावना प्रा. राथ यांची विवेकभ्रष्ट केविलवाणी अवस्था पाहून होते. आणि सर्वात पहिले आस्कर विजेता प्रख्यात अभिनेता एमिल जेनिन्ज यांचा प्रा. राथ अजरामर ठरला.

'द ब्लू एंजल' काम, मोह, नैतिक अधःपतन आणि समाजाची निर्दयी तरीही भूलवणारी गडद बाजू दर्शवते. तर 'लोला' फॅसिझम उदयापूर्वीच्या काळातील 'कॅबरे युगा'चे जीवघेणे आकर्षण आणि धोकादायक झगमगाट यांचे प्रतिनिधित्व करते.

अनिर्बंध मोहिनीमुळे वेडेपणाची परिसीमा झाल्याने कठोर दडपशाहीची संरचना देखील कशी पूर्णपणे कोसळून शोकांतिकेत परिवर्तित होते. याची उत्तम मांडणी यात दिसते.

तत्कालीन पांढरपेशा समाजाच्या दांभिकतेचे वाभाडे काढणारी ही कथा स्टर्नबर्ग यांनी पैशाच्या तालावर नाचणार्या नर्तकीच्या मोहाने कडक शिस्तीच्या विद्वत्ता प्रचूर प्राध्यापकाचे अधःपतनाची शोकांतिका म्हणून सादर केली. जीवनभर सांभाळलेला सत्चारित्र्याचा अभेद्य किल्ला केवळ एका स्त्रीमोहाच्या सुरुंगाने ढासळतो. याचं उत्तम उदाहरण म्हणजे, विश्वामित्र-मेनका. शारीरिक जन्मानंतर मनुष्याच्या अस्तित्वाला अर्थपूर्ण महत्व मिळवून देणारं व्यक्तिमत्व गुरुचं असतं.

मग ते गुरु तितकेच उच्च श्रेणीचे असावेत असा संकेत असल्याने गुरुकडूनही स्फटीकासारख्या शुद्ध चारित्र्याची अपेक्षा असते. त्यामुळेच 'गुरुः साक्षात परब्रह्म' ही संकल्पना अस्तित्वात आली. पण आजच्या शिक्षणक्षेत्रात अशा सत्शील ज्ञानदात्या गुरुंपेक्षा पोटार्थी ज्ञानविक्रेत्यांनी बाजार मांडला आहे. तोही आज समाजमान्य आहे; पण आपल्या विद्यार्थिनींसोबत मर्यादा लांघणारे कामवासनांध गुरु सामाजिक र्हासास अधिक गती देत समस्त शिक्षणक्षेत्र दूषित करतात, हे अमान्यच.

जशी शिष्याला पारखून घेण्याची गुरुला गरज तर मग जसे पाणी गाळून घेतो तसे शिष्यानेही गुरु पारखून घेणे आवश्यक. नाहीतर केवळ हाच जन्म नाही तर पुढील अनेक जन्म मानवाला अधांतरी भटकत रहावं लागते. यासाठीच कबीर म्हणतात...

गुरु कीजिए जानि के,
पानी पीजै छानि।
बिना विचारे गुरु करे,
परे चौरासी खानि।।

– जीवनदर्शी चित्रकथा : राजभूषण सहस्रबुद्धे
९८२२२०६०२६



## ज्येष्ठ दिग्दर्शक भारतीराजा यांचे निधन

चेन्नई : तामिळनाडूतील प्रख्यात दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथा लेखक पी. भारतीराजा यांचे बुधवारी निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. वयोमानाशी संबंधित गुंतागुतीमुळे ते गेल्या काही दिवसांपासून त्रस्त होते. तामिळ चित्रपटांना ग्रामीण टच देत ते खेड्यांपर्यंत पोहोचविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या पार्थिवाावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्याच्या पश्चात पत्नी चंद्रलिला आणि मुलगी जननी, असा परिवार आहे. तमिळ, तेलगू अणि हिंदी चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल त्यांना पद्मश्रीने गौरविण्यात आले होते. राहत्या घरी त्यांचे निधन झाले. अभिनेता ते मुख्यमंत्री असा प्रवास करणारे विजय, ज्येष्ठ अभिनेते रजनिकांत आणि कमल हासन यांनी त्यांच्या सोबत काम केले होते. त्यामध्ये '१६ वयथिनिले' या गाजलेल्या चित्रपटाचा समावेश आहे. त्यात कमल हासन, श्रीदेवी आणि रजनिकांत यांनी काम केले होते तमिळ भाषेतील हा रोमँटिक ड्रामा चित्रपट असून तो १९७७ मध्ये प्रदर्शित झाला होता. इलाईराजा यांनी संगीत दिले होते. त्याचे दिग्दर्शन 'भारतीराजा' यांनी केले होते. हा चित्रपट तमिळ चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील एक मैलाचा दगड मानला जातो. भारतीराजा यांच्या निधनाचे वृत्त समजताच दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली. द्रमुकचे अध्यक्ष एम. के. स्टॅलिन यांनी सुद्धा अन्य कलाकारांसोबत भारतीराजा यांच्या घरी धाव घेतली व श्रद्धांजली अर्पण केली. राज्यपाल राजेंद्र आर्लेकर, मुख्यमंत्री विजय, अण्णा द्रमुकचे सरचिटणीस इडाप्पडी पलानीस्वामी यांन्री दुःख व्यक्त करुन महान दिग्दर्शक हरपल्याचे सांगितले.

भारतीराजा यांचा जन्म १७ जुलै १९४१ रोजी थेनी जिल्ह्यातील अलिनागरम येथ झाला. चिन्नासामी' या टोपण नावाने परिचित असलेल्या भारतीराजा यांनी अत्यंत सामान्य कुटुंबातून वर येत दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीची दिशा कायमची बदलून टाकली. १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धात त्यांच्या आगमनापूर्वी, तमिळ चित्रपटसृष्टीवर इनडोअर स्टुडिओ सेट्स, अतिनाट्यपूर्ण सादरीकरण आणि शहरी जीवनावर आधारित कथांचे वर्चस्व होते मात्र, त्यांनी ग्रामीण कथानकांवर भर दिला. तमिळ, तेलगू आणि हिंदीत त्यांनी सुमारे ४० चित्रपटांची निर्मिती केली. त्यामध्ये तमिळ भाषेतील 'सिगप्पू रोजक्कल' (१९७८) 'अलायगल ओइवथिल्लाई' (१९८१), अभिनेते शिवाजी गणेशन यांची भूमिका असलेला 'मुधल मरियाथाई' (१९८५) आणि स्त्री भ्रूणहत्येच्या धोक्यावर भाष्य करणार्या एका भेदक सामाजिक चित्रपट 'करुथम्मा' (१९९४) यांचा समावेश आहे.

## प्राजक्ता माळीने चाहत्यांना दिली आनंदाची बातमी

अभिनेत्री प्राजक्ता माळीने चाहत्यांना दिली आनंदाची बातमी, लवकरच...; चाहत्यांकडून भरभरून शुभेच्छांचा वर्षाव

मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळीनआपल्या चाहत्यांना एक आनंदाची बातमी दिली आहे. अभिनय, सूत्रसंचालन, नृत्य, निर्मिती आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारी प्राजक्ता आता एका नव्या प्रवासासाठी सज्ज झाली आहे.

सूरज चव्हाणच्या घरी येणार चिमुकला पाहुणा! 'बिग बॉस मराठी' विजेत्याने दिली गोड बातमी 'बिग बॉस मराठी ५'चा विजेता आणि सोशल मीडिया स्टार सूरज चव्हाण (डीरक्ष उहरींप) याच्या घरी लवकरच चिमुकल्या पाहुण्याचे आगमन होणार आहे. लग्नानंतर काही महिन्यांतच लवकरच तेलुगू चित्रपटसृष्टीत दिसणार

मराठी मालिकांपासून ते चित्रपटांपर्यंत अनेक गाजलेल्या भूमिका साकारत प्राजक्ताने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. तिच्या सहजसुंदर अभिनयशैलीमुळे आणि विविधांगी व्यक्तिमत्त्वामुळे ती घराघरांत लोकप्रिय झाली आहे. मराठी मनोरंजन क्षेत्रात आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारी प्राजक्ता माळी आता तेलुगू चित्रपटसृष्टीत पदार्पण करण्यासाठी सज्ज झाली आहे. तिच्या आगामी तेलुगू चित्रपटाचे चित्रीकरण सध्या सुरू असून, हा चित्रपट याच वर्षात प्रेक्षकांच्या भेटीला येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव या नव्या प्रोजेक्टबाबत बोलताना प्राजक्ताने सांगितले की, चित्रपटाची कथा, कलाकारांची नावे तसेच तिच्या भूमिकेबाबतची अधिकृत माहिती लवकरच समोर येईल. त्यामुळे या चित्रपटातील तिची भूमिका, कथानक आणि कलाकारांविषयीची माहिती अद्याप गुप्त आहे. त्यामुळे प्राजक्ताचा लूक कसा असेल? ती कोणत्या प्रकारची भूमिका साकारणार? आणि तिच्यासोबत कोणते कलाकार दिसणार? याबाबत चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. आता मराठी मनोरंजनविश्वात यशस्वी ठरलेली प्राजक्ता दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतही आपली छाप पाडणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तिच्या या नव्या प्रवासामुळे चाहतेही प्रचंड आनंदित झाले असून सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव करत आहे.




### कोल्हापूर येथे मतमोजणी

## अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाची पंचवार्षिक निवडणूक सुरळीत

पुणे : अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीतील मतदानाची प्रक्रिया रविवारी पार पडली. पुण्यासह मुंबई, कोल्हापूर, सोलापूर आणि नाशिक येथील केंद्रांवर मतदान झाले. पुण्यातील ७२९ मतदारांपैकी ४६० मतदारांनी स. प. महाविद्यालय येथे मतदानाचा हक्क बजावला. मतदानावेळी प्रचार करण्यात आल्याने काहीवेळ गोंधळाचे वातावरण होते.

चित्रपट महामंडळाचे 'अ' आणि 'ब' वर्ग असे ६५ हजारावर सभासद आहेत. केवळ 'अ' वर्ग सभासदांना मतदान करता येते. मात्र, त्यातील केवळ ३ हजार ४०३ सभासदांना मतदान करता येणार होते. दहा वर्षांनंतर ही निवडणूक होत आहे. पुण्यातील मतदानासाठी स. प. महाविद्यालयात केंद्र तयार करण्यात आले होते. सकाळी आठ ते सायंकाळी पाच या वेळेत ४६० जणांनी मतदान केले. अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.ज्येष्ठ अभिनेत्री लीला गांधी, वर्षा उसगांवकर, सुवर्णा काळे, महामंडळाचे माजी अध्यक्ष मेघराज राजेभोसले, अभिनेते चेतन दळवी, माधव अभ्यंकर, सुनील गोडबोले, जगन्नाथ निवंगुणे, विजय चौधरी, अनिल नगरकर, दिग्दर्शक नागराज मंजुळे, सतीश रणदिवे, अभिनेते आनंद काळे, निर्माते भाऊसाहेब भोईर, सुनील महाजन, अनिल धुमाळ, अनिल जाधव, लेखक पितांबर काळे यांनी मतदान केले. आज कोल्हापूर येथे मतमोजणी होणार आहे.



## बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ

### घातल्यानंतर कधी आणि कोणत्या ओटीटी होणार

राम चरणचा बहुप्रतीक्षित आणि चर्चेत असलेला स्पोर्ट्स ड्रामा 'पेद्दी' सध्या बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घालत आहे. 'धुरंधर २'नंतर २०२६ मधील सर्वात मोठ्या पॅन इंडिया चित्रपटांपैकी एक मानल्या गेलेल्या या सिनेमाला प्रेक्षकांचा जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. रिलीजच्या पहिल्याच दिवसापासून चित्रपटाने कमाईचे नवे विक्रम प्रस्थापित करण्यास सुरुवात केली असून, देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर २०० कोटींच्या दिशेने त्याची दमदार वाटचाल सुरू आहे. एवढेच नाही, तर परदेशातही 'पेद्दी'ला मोठ्या प्रमाणात पसंती मिळत असून राम चरणच्या अभिनयाचे विशेष कौतुक होत आहे.

४ जुलै रोजी प्रदर्शित झालेल्या या सिनेमाबाबत आता जढढ प्रेक्षकांसाठीही आनंदाची बातमी समोर आली आहे. थिएटरमध्ये यशस्वी धाव घेत असतानाच 'पेद्दी' कोणत्या प्लॅटफॉर्मवर आणि कधी रिलीज होणार, याबाबतची माहिती समोर येऊ लागली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या चित्रपटाचे डिजिटल स्ट्रीमिंग हक्क नेटफ्लिक्सने घेतले आहेत. विशेष म्हणजे, चित्रपटाच्या सुरुवातीच्या क्रेडिट्समध्येच नेटफ्लिक्सचा उल्लेख करण्यात आला होता, त्यामुळे जढढ पार्टनरबाबत आधीपासूनच चर्चा रंगली होती. सध्या अधिकृत रिलीज डेट जाहीर करण्यात आलेली नसली तरी, चित्रपटसृष्टीतील सध्याचा ट्रेंड पाहता 'पेद्दी' थिएटर रिलीज झाल्यानंतर साधारण आठ ते दहा आठवड्यांच्या आत जढढ वर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे जुलैच्या अखेरीस किंवा ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रेक्षकांना पाहायला मिळू शकतो. विशेषतः ज्यांना मोठ्या पडद्यावर चित्रपट पाहण्याची संधी मिळाली नाही, त्यांच्यासाठी ही एक मोठी आनंदाची बातमी ठरत आहे.

## पुणे लघुपट महोत्सवात आगमन ठरला सर्वोत्कृष्ट




पुणे : नवोदित कलाकारांसाठी मराठी चित्रपट परिवार संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या सोळाव्या पुणे लघुपट महोत्सवात 'आगमन' हा लघुपट सर्वोत्कृष्ट ठरला, तर 'फिंगर रिंग'ला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले. 'कासरा'ची सर्वोत्कृष्ट पटकथा लेखन म्हणून निवड करण्यात आली.

पुण्यातील सारसबागेजवळील बाळासाहेब ठाकरे व्यंग्यचित्र कलादालन सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवाचे पारितोषिक वितरण ज्येष्ठ लेखक सुभाषचंद्र जाधव, चित्रपट दिग्दर्शक निर्माते निखिल मित्तल आणि 'केसरी'च्या कल्पना खरे यांच्या हस्ते करण्यात आले. महोत्सवाचे संचालक योगेश बारस्कर यावेळी उपस्थित होते. महोत्सवामध्ये विविध देशांतील शंभरहून अधिक लघुपटांचे प्रदर्शन करण्यात आले.'हिरवं सोनं', 'शॅडो', 'लास्ट ब्लूम', 'इनोसंट ट्रॅव्हल', 'जोन्स', 'कलयुग', 'ज्योती', 'पेज बाउंड', 'फरगॉटन नोट्स', 'लेडी बग्ज', 'रिपल्स ऑफ गंगा' 'डिव्हाइन पेन' या लघुपटांना वेगवेगळ्या विभागात पुरस्कार मिळाले 'आखाडाच्या महिन्यात'साठी भाग्यश्री मोटे यांची सर्वोत्कृष्ट प्रायोगिक दिग्दर्शक म्हणून निवड करण्यात आली. 'द इंट्रुडर'ची सर्वोत्कृष्ट भारतीय लघुपट म्हणून निवड करण्यात आली.

## महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या विविध कर्ज आणि अनुदान योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय लातूर यांच्या वतीने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ५० टक्के अनुदान योजनेअंतर्गत ३५, बीजभांडवल योजनेअंतर्गत ३५ आणि थेट कर्ज योजनेअंतर्गत ७० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून, या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील (मांग, मातंग, चांभार व खाटीक वगळून) गरजू लाभार्थ्यांकडून https://mahadisha.mpbcdc.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी लाभार्थ्यांची वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे असणे अनिवार्य असून, ऑनलाईन अर्ज करताना जातीचा व उत्पन्नाचा मूळ दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, रेशनकार्डची झेरॉक्स प्रत, आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र, आधार लिंक असलेल्या बँकेच्या पासबुकची झेरॉक्स, टी.सी. व मार्क मेमोसारखी शैक्षणिक कागदपत्रे, व्यवसायाचे कोटेशन, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, उद्यम आधार, शॉप क्ट, संबंधित व्यवसायाचे प्रशिक्षण किंवा अनुभव प्रमाणपत्र आणि दोन पासपोर्ट साईझ फोटो इत्यादी कागदपत्रांची प्रामुख्याने आवश्यकता आहे. संकेतस्थळावर यशस्वीरित्या ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर, त्या अर्जाच्या दोन प्रती शिवनेरी गेट समोरील जुनी डालडा फॅक्टरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या तळमजल्यावर असलेल्या महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या कार्यालयात प्रत्यक्ष जमा करणे आवश्यक आहे. या योजनेची सविस्तर माहिती पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त गरजू लाभार्थ्यांनी वेळेत ऑनलाईन अर्ज करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महामंडळाचे लातूर जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

## महानगरपालिकेचा जन्म मृत्यू विभाग सुट्टी दिवशी सुद्धा राहणार कार्यरत

**लातूर/ प्रतिनिधी:** प्रति वर्षी जुन महिन्यामध्ये शाळांमध्ये प्रवेश घेण्याची प्रक्रिया सुरू होते. याकरिता नागरिक आपल्या पाल्याचे जन्म प्रमाणपत्रासाठी मोठ्या संख्येने महापालिकेत येत आहेत. याबाबीचा दखल घेत लातूर शहर महानगरपालिकेचा जन्म-मृत्यु विभाग दिनांक १३/६/२०२६ व १४/०६/२०२६ वार शनिवार व रविवार या दोन्ही सुट्टीच्या दिवशी कार्यालयीन वेळेत कार्यान्वित राहणार आहे.

तरी गरजू नागरिकांनी आपल्या पाल्याचे जन्म प्रमाणपत्र घेण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# नि:पक्ष, भयमुक्त निवडणुकीसाठी आवश्यक उपाययोजना करा- निवडणूक निरीक्षक मिलिंद बोरकर

**लातूर, (जिमाका):** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. प्रत्येक तहसीलदार कार्यालयामध्ये यासाठी मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली असून या मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच ही निवडणूक नि:पक्ष आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना निवडणूक निरीक्षक मिलिंद बोरकर यांनी दिले. लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आयोजित मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, सूक्ष्म निरीक्षक यांच्या प्रशिक्षणाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, लातूर शहर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश पवार यावेळी उपस्थित होते.



मतदान साहित्य वितरण व स्वीकृती केंद्राचे काम योग्य प्रकारे पार पाडावे. मतपेट्या सुरक्षितपणे मतदान केंद्रावर पोहोचविणे तसेच मतदानानंतर सीलबंद मतपेट्यांची वाहतूक कडक सुरक्षा व्यवस्थेत करावी. या प्रक्रियेत कोणतीही उणीव राहणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी. मतदान केंद्र तहसील कार्यालयात असल्याने मतदारांच्या सोयीसाठी रॅम्प व व्हीलचेअरची व्यवस्था उपलब्ध असावी. निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची खबरदारी घ्यावी. निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे नि:पक्षपाती राहण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे, असेही निवडणूक निरीक्षक श्री. बोरकर यांनी सांगितले.

मतदान केंद्रावर नियुक्त सर्व केंद्राध्यक्ष, कर्मचारी यांनी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे. सर्वांनी समन्वयाने काम करून मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडावी, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यावेळी म्हणाले.

प्रारंभी देवणीचे तहसीलदार सोमनाथ वाडकर यांनी उपस्थितांना निवडणूक विषयक प्रशिक्षणाची माहिती दिली.

**लातूर, औसा येथील मतदान केंद्रांना भेट; सुरक्षा कक्षाची पाहणी**

उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक मिलिंद बोरकर यांनी लातूर तहसीलदार कार्यालय आणि औसा तहसील कार्यालय येथील मतदान केंद्रांना भेट देवून तेथील सुविधांची पाहणी केली. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात तयार करण्यात आलेल्या मतपेटी सुरक्षा कक्षाला भेट देवून तेथील उपाययोजनांचा आढावा घेतला.

# महात्मा बसवेश्वरच्या प्रा. किसनाथ कुडके यांची राष्ट्रीय सेवा योजना अधिक दोन स्तरावर जिल्हा समन्वयकपदी नियुक्ती

**लातूर/प्रतिनिधी:** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथील व्यवसाय शिक्षण विभागात कार्यरत असलेले प्रा. किसनाथ कुडके यांची महाराष्ट्र शासनाच्यावतीने राष्ट्रीय सेवा योजना अधिक दोन स्तरावर लातूर जिल्हा समन्वयक म्हणून नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.



त्यांच्या या निवडीबद्दल महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. सिद्राम डोंगरगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, डॉ. दीपक चाटे, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. यशवंत वळवी, डॉ. जितेंद्र देशमुख, डॉ. शीतल येरुळे, डॉ. सुजीत हांडीबाग, डॉ. मंतोष स्वामी, डॉ. तेजश्री महाजन, प्रा. व्यंकट दुडीले, प्रा. आशिष क्षिरसागर, प्रा. प्रवीण पोटभरे, प्रा. शिवशंकर कामाजी, प्रा. सोनाली खुबा आदी उपस्थित होते.

प्रा. किसनाथ कुडके हे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून २०२२ पासून महाविद्यालयामध्ये कार्यरत आहेत, तसेच त्यांना २०१६ मध्ये महात्मा फुले शिक्षण परिषद, पुणे यांच्यावतीने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. ते बहुजन राष्ट्रीय परिषदेचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश प्रवक्ते म्हणून कार्यरत आहेत. सामाजिक कार्यामध्ये व शैक्षणिक उपक्रमामध्ये सततच अग्रशील असलेले प्रा. किसनाथ कुडके हे महात्मा बसवेश्वर महाविद्यालयामध्ये इंग्रजी विषयाचे अध्यापन करतात. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन नुकतीच मा. संजय पंचगल्ले, शिक्षण उपसंचालक, विभागीय कार्यालय, लातूर यांनी ही नियुक्ती केली आहे.

त्यांच्या या नियुक्ती बद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे यांच्यासह सर्व सन्माननीय संचालक मंडळ, शिक्षण सहसंचालक संजय पंचगले, विभागीय समन्वयक डॉ. संदिपान जगदाळे, माजी जिल्हा समन्वयक प्रा. विजय गवळी, महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्य समन्वयक, उपप्राचार्य प्रा. नितीन वाणी, पर्यवेक्षक डॉ. गुणवंत बिरादार, कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. मनोहर चपळे आदींसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## हिंदू खाटीक समाजासाठी सुवर्णसंधी; विविध कर्ज व अनुदान योजनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्यादित (महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित यांची उपकंपनी) लातूर जिल्हा कार्यालयामार्फत सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी विविध कर्ज आणि अनुदान योजना राबविण्यात येणार असून, या योजनांसाठी मुख्यालयाकडून उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. या अंतर्गत अनुदान योजनेसाठी ०५, बीजभांडवल योजनेसाठी ०५, थेट कर्ज योजनेसाठी ०६, एनएसएफडीसी टर्म लोनसाठी ०५, एनएसएफडीसी सूक्ष्म पतपुरवठ्यासाठी ०१ आणि एनएसएफडीसी उच्च शैक्षणिक कर्ज योजनेसाठी ०१ असे उद्दिष्ट प्राप्त झाले असून, अनुसूचित जातीतील हिंदू खाटीक समाजातील पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे असणे आवश्यक आहे. अर्जासोबत जातीचा व उत्पन्नाचा मूळ दाखला, रेशनकार्ड, आधारकार्ड, पॅनकार्ड आणि मतदान ओळखपत्राची झेरॉक्स प्रत, रहिवासी प्रमाणपत्र, व्यवसायाचे कोटेशन, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, आधार लिंक असलेल्या बँकेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत, उद्यम आधार, टी.सी. व मार्क मेमोसारखी शैक्षणिक कागदपत्रे, संबंधित व्यवसायाचे प्रशिक्षण व अनुभव प्रमाणपत्र, व्यवसाय परवाना (शॉप क्ट) आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडणे अनिवार्य आहे. इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळमजला, जुनी डालडा फॅक्टरी, शिवनेरी गेट समोर, लातूर येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा. लातूर जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील हिंदू खाटीक समाजातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या कर्ज आणि अनुदान योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, लातूरचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातर्फे व्यापक संरक्षा जनजागृती मोहिमेद्वारे 'आंतरराष्ट्रीय लेव्हल क्रॉसिंग जागरूकता दिवस' (ILCAD) साजरा

**सोलापूर/प्रतिनिधी:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने ९ जून २०२६ रोजी 'आंतरराष्ट्रीय लेव्हल क्रॉसिंग जागरूकता दिवस' (ILC-D) साजरा केला. याअंतर्गत सोलापूर-वाडी, सोलापूर-दौंड, कुर्डुवाडी-लातूर आणि कुर्डुवाडी-मिरज या सेक्शनमधील विविध ठिकाणी व्यापक जागरूकता कार्यक्रम आणि संपर्क उपक्रम राबविण्यात आले. लेव्हल क्रॉसिंगवरील सुरक्षित पद्धती आणि अपघात प्रतिबंधाचे महत्त्व यांबाबत रस्ते वापरकर्ते, रेल्वे कर्मचारी व स्थानिक नागरिकांना जागरूक करणे हा या मोहिमेचा उद्देश होता.



संपूर्ण विभागात राबविण्यात आलेल्या ILC-D २०२६ मोहिमेचा भाग म्हणून, सोलापूर विभागाने संरक्षेशी संबंधित अनेक उपक्रम हाती घेतले, ज्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होता:

* लेव्हल क्रॉसिंगवरील सुरक्षित पद्धतींबाबत ५,२१७ रस्ते वापरकर्त्यांचे समुपदेशन.
* संरक्षा कार्यपद्धती आणि कामकाजातील सतर्कता अधिक दृढ करण्यासाठी २०१ गेटमन आणि रेल्वे कर्मचाऱ्यांचे समुपदेशन.
* संरक्षा मानकांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी आणि सुधारणेस वाव असलेल्या बाबी ओळखण्यासाठी २६ लेव्हल क्रॉसिंग गेट्सची तपासणी.
* रेल्वे कर्मचारी आणि संबंधित घटकांमध्ये जागरूकता पसरवण्यासाठी १५ ऑनलाइन संरक्षा बैठका व परिसंवादांचे आयोजन.
* जनतेपर्यंत संरक्षेचा संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी सोलापूर स्थानक (दोन कार्यक्रम) आणि लेव्हल क्रॉसिंग गेट क्र. ६१ (दोन कार्यक्रम) येथे चार पथनाट्यांचे (Nukkad Natak) आयोजन.
* विभागातील २६ लेव्हल क्रॉसिंग गेट्स आणि रेल्वे स्थानकांवर ६,५०० संरक्षा पत्रकांचे (Pamphlets) वाटप. हे वाटप रेल्वे अधिकारी, स्टेशन मास्टर्स, ट्रॅफिक इन्स्पेक्टर्स, परमनंट वे इन्स्पेक्टर्स, सिग्नल सुपरवायझर्स आणि विभागीय संरक्षा पथकाद्वारे करण्यात आले.

जागरूकता कार्यक्रमांदरम्यान जनतेला असा सल्ला देण्यात आला की, रेल्वे मार्ग ओलांडण्यापूर्वी नेहमी 'थांबा, पहा आणि ऐका' (Stop, Look and Listen) या तत्त्वाचे पालन करावे; गेट्स बंद असताना किंवा बंद होत असताना मार्ग ओलांडू नये; मोबाईल फोन आणि इअरफोन्ससारख्या गोष्टींमुळे होणारे दुर्लक्ष टाळावे; गेटकीपर्सच्या सूचनांचे पालन करावे आणि रेल्वे मार्गावर वाहने उभी करणे टाळावे. तसेच, विद्युतीकरण झालेल्या रेल्वे मार्गांवर ओव्हरहेड उपकरणांपासून (OHE) सुरक्षित अंतर राखण्यावर आणि अति-उंचीची किंवा ओव्हरलोड वाहने चालवताना विशेष खबरदारी घेण्यावर भर देण्यात आला.

लेव्हल क्रॉसिंग गेट क्र. ६१ येथे संरक्षा जनजागृतीचा मोठा कार्यक्रम

या उपक्रमाचा एक भाग म्हणून, विभागीय संरक्षा पथकाने 'तिलाटी' (Tilati) जवळील लेव्हल क्रॉसिंग गेट क्र. ६१ येथे एका मोठ्या संरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात रेल्वे अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, शैक्षणिक संस्था आणि रस्ते वापरकर्ते यांनी सक्रिय सहभाग घेतला. विभागीय संरक्षा पथक आणि विभागीय सांस्कृतिक अकादमीच्या सदस्यांनी संयुक्तपणे सादर केलेले 'पथनाट्य' (Nukkad Natak) हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. या प्रभावी सादरीकरणातून संरक्षेबाबतचे महत्त्वाचे संदेश देण्यात आले आणि रेल्वे मार्ग ओलांडताना जबाबदार वर्तन करण्याबाबत प्रोत्साहन देण्यात आले. तसेच, २५ केव्ही (kV) ओव्हरहेड उपकरणांशी (OHE) संबंधित धोक्यांबाबत विशेष जनजागृती सत्रेही घेण्यात आली. यात ट्रक चालक, अवजड वाहनांचे चालक आणि रेल्वे कर्मचाऱ्यांना जिवंत विद्युत उपकरणांपासून किमान दोन मीटरचे सुरक्षित अंतर राखणे आणि ओव्हरहेड वायरींशी (विद्युत वाहक तारांशी) अनधिकृत संपर्क येण्यामुळे होणाऱ्या धोक्यांविषयी माहिती देण्यात आली. या जनजागृती मोहिमेला बळकटी देण्यासाठी, स्थानिक गावचे सरपंच आणि शाळेच्या प्रमुखांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले; तसेच लेव्हल क्रॉसिंगवरील संरक्षा सुनिश्चित करण्यासाठी लोकसहभागाची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. कार्यक्रमादरम्यान, सुमारे ८८० रस्ते वापरकर्त्यांना लेव्हल क्रॉसिंगवरील संरक्षा, रेल्वे कायद्यातील तरतुदी आणि अपघात टाळण्यासाठी घ्यायची खबरदारी यांबाबत थेट मार्गदर्शन करण्यात आले. रस्ते वापरकर्त्यांमध्ये माहितीपत्रके आणि जनजागृतीपर पत्रके वाटण्यात आली, ज्यामध्ये रेल्वे मार्ग ओलांडण्याच्या योग्य पद्धती आणि सतर्कतेची आवश्यकता यांवर भर देण्यात आला. लेव्हल क्रॉसिंग संरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची आणि आपल्या समाजात सुरक्षित रेल्वे-संबंधित पद्धतींचा प्रसार करण्याची शपथ सर्व उपस्थितांनी घेऊन या कार्यक्रमाची सांगता झाली.

संरक्षा विभागाने आयोजित केलेल्या या मोहिमेत विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM), शाखा अधिकारी आणि रेल्वे कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग संरक्षेला आपले सर्वोच्च प्राधान्य मानत असून, नियमित जनजागृती उपक्रमांद्वारे लोकांमध्ये संरक्षेबाबत जागरूकता वाढवण्यासाठी कटिबद्ध आहे.

# जोड इंडिया: स्थानिक व्यवसायांना डिजिटल प्रगतीशी जोडणारे एक विश्वासार्ह व्यासपीठ

**पुणे/प्रतिनिधी:** आजच्या डिजिटल युगात कोणत्याही व्यवसायाच्या यशासाठी ऑनलाइन उपस्थिती अत्यंत महत्त्वाची बनली आहे. ग्राहक आता उत्पादने आणि सेवांची माहिती मिळवण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. अशा परिस्थितीत अनेक स्थानिक दुकाने, हॉटेल्स, सेवा प्रदाते आणि लघु उद्योजकांना आपल्या व्यवसायाची डिजिटल ओळख निर्माण करणे आणि नवीन ग्राहकांपर्यंत पोहोचणे आव्हानात्मक ठरते.

ही गरज लक्षात घेऊन जोड इंडिया हे भारतीय डिजिटल व्यासपीठ विकसित करण्यात आले आहे, ज्याचे उद्दिष्ट स्थानिक व्यवसायांना डिजिटल जगाशी जोडणे आणि त्यांच्या वाढीसाठी नवीन संधी उपलब्ध करून देणे आहे.

जोड इंडिया व्यवसायांना स्वतःची डिजिटल ओळख निर्माण करण्यासाठी, उत्पादने व सेवांचे ऑनलाइन प्रदर्शन करण्यासाठी आणि संभाव्य ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी एक सोपा व प्रभावी मार्ग उपलब्ध करून देते. हे व्यासपीठ अशा प्रकारे तयार करण्यात आले आहे की मर्यादित तांत्रिक ज्ञान असलेले व्यावसायिकही सहजपणे आपली डिजिटल प्रोफाइल तयार करू शकतात.

या प्लॅटफॉर्मवर व्यवसायांना खालील सुविधा उपलब्ध आहेत:

* ०% कमिशन मॉडेल
* ग्राहकांशी थेट संपर्क
* सोपी डिजिटल व्यवसाय उभारणी
* व्यवसायाच्या दृश्यमानतेसाठी डिजिटल स्टोअरफ्रंट
* व्यवसाय सूचीकरण व प्रमोशनच्या संधी

या सुविधांमुळे व्यवसाय मालकांना त्यांच्या व्यवसायावर अधिक नियंत्रण मिळते आणि ग्राहकांशी अधिक प्रभावी संबंध निर्माण करता येतात.

जोड इंडियाचा उद्देश केवळ ऑनलाइन उपस्थिती निर्माण करणे नसून भारतातील स्थानिक व्यवसाय परिसंस्था अधिक मजबूत करणे आहे. हे व्यासपीठ व्यवसायांना त्यांची पोहोच वाढविण्यास, ब्रँडची ओळख मजबूत करण्यास आणि नवीन व्यावसायिक संधी मिळविण्यास मदत करते.

जोड इंडियाचा विश्वास आहे की भारताच्या अर्थव्यवस्थेची खरी ताकद स्थानिक उद्योजक आणि व्यवसायांमध्ये आहे. याच विचारातून हे व्यासपीठ तंत्रज्ञान अधिक सोपे, सुलभ आणि उपयुक्त बनवून व्यवसायांच्या डिजिटल परिवर्तनाला चालना देत आहे.

बदलत्या डिजिटल वातावरणात जोड इंडिया हे स्थानिक व्यवसायांसाठी एक विश्वासार्ह डिजिटल भागीदार म्हणून उदयास येत आहे, जे त्यांना अधिक दृश्यमानता, अधिक संधी आणि शाश्वत वाढ साध्य करण्यासाठी मदत करते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# जून महिन्यातही १२८ गावात टंचाई; १२ ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा

धाराशिव (प्रतिनिधी)–गतवर्षी मान्सूनमध्ये सहा महिने पाऊस झाले. मात्र सिंचनासाठी पाण्याचा बेसुमार उपसा झाल्याने प्रकल्पांनी मे महिन्यातच तळ गाठले. परिणामी, जिल्ह्यातील १२८ गावांना टंचाईच्या झळा सहन कराव्या लागत आहेत. या गावांसाठी २०८ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. यातील १२ गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. पाणी टंचाई तीव्र होऊ नये, यासाठी प्रशासनाने ४४ प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवले आहे.

मागील वर्षी मे महिन्यातही जिल्ह्यातील सर्वच महसूल मंडळात धुवाँधार पाऊस झाले होते. काही भागात अतिवृष्टीही झाली होती. त्यामुळे उन्हाळ्यातच नद्या प्रवाहित झाल्या होत्या. त्यानंतर जून ते सप्टेंबर चार महिनेही पावसाचे राहिले. ऑक्टोबर महिन्यात परतीचे पाऊसही जोरदार झाले. सहा महिने पावसाचे राहिल्याने दोनशेहून अधिक प्रकल्पात ओव्हरफ्लो झाले होते. मार्च महिन्यापासून उन्हाच्या झळा तीव्र होऊ लागताच पाण्याचा वापरही वाढू लागला. शेतीपिकांना पाण्याचा उपसा वाढला. शिवाय, तापमान ४० अंशाच्या पुढे गेल्याने बाष्पीभवनही वाढले. त्यामुळे मे महिन्यातच प्रकल्पातही पाणी साठा झपाट्याने कमी झाला. त्यामुळे अनेक गावातील पाणीपुरवठ्यावरही परिणाम होऊ लागला आहे. ग्रामस्थांना पाणी टंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने अधिग्रहण, टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. जिल्ह्यातील तब्बल ११६ गावांना अधिग्रहित विहिरीद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर थेट टँकरद्वारे १२ गावांना पाणी दिले जात आहे. पावसाला विलंब झाल्यास अधिग्रहणांची संख्याही वाढू शकेल. जिल्ह्यातील २२७ प्रकल्पापैकी १० प्रकल्प कोरडे पडले आहेत. उर्वरित प्रकल्पात ९३.२४५ दलघमी उपयुक्त पाणीसाठा आहे. त्याची टक्केवारी १२.७७ टक्के इतकी आहे. गतवर्षी याच कालावधीत प्रकल्पात २०५.७५९ दलघमी उपयुक्त पाणीसाठा होता. त्याची टक्केवारी २८.१७ एवढी होती. एप्रिल महिन्यापासून पाणीटंई लक्षात घेऊन टँकर, विहीर अधिगृहण, विंधन विहिरी दुरुस्ती आदी कामांसाठी १३ कोटीचा टंचाई आराखडा तयार केलेला आहे. १२८ गावांसाठी २०८ विहिरी अधिग्रहित केल्या आहेत. मोठा पाऊस झाल्यास अधिग्रहणे, टँकर बंद केली जातील. सूर्यकांत निकम, कार्यकारी अभियंता. ४४ प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी आरक्षित ठेवले आहे. सिंचनासाठी उपसा करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. त्यासाठी भरारी पथकेही नियुक्त आहेत. ११ जून रोजी तांबेवाडी प्रकल्पातही पथकाने विद्युत पुरवठा खंडीत केला आहे. प्रकल्पातील पाणी ऑगस्टपर्यंत पुरेल इतके आहे. अजित मदने, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग क्र.१ धाराशिव तालुक्यातील येडशी, नांदुर्गा, जवळे दु. कौडगाव बावी, खामगाव, पळसप, बोरखेडा, ढोकी या गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. भूम तालुक्यातील आष्टावाडी, ईराचीवाडी, सावरगाव पा., पखरुड, आंतरवली येथे टँकर सुरू आहे.

# खत-बियाण्यांचा तुटवडा, डुप्लिकेट मालाचा सुळसुळाट; शेतकऱ्याच्या जीवावर कारखानदार, व्यापारी आणि दुकानदार गबरगंड!

धाराशिव । (रामेश्वर डोंगरे) खरीप हंगामाच्या पेरणीचे दिवस जवळ येताच धाराशिव जिल्ह्यात खत आणि बियाण्यांचा तुटवडा निर्माण होऊ लागला असून, त्याचा थेट फटका बळीराजाला बसत आहे. एका बाजूला खतांचे शॉर्टेज, तर दुसऱ्या बाजूला डुप्लिकेट बियाण्यांचा बाजार फोफावत असल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे.

बाजारात ओरिजनलच्या नावाखाली डुप्लिकेट बियाण्यांची विक्री होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. कोणते बियाणे खरे आणि कोणते बनावट, हे ओळखण्याची कोणतीही स्पष्ट व्यवस्था नसल्यामुळे शेतकरी संभ्रमात आहे. विशेष म्हणजे, काही ठिकाणी निकृष्ट किंवा कमी दर्जाच्या बियाण्यांची विक्री मात्र पूर्ण एमआरपी दराने केली जात असल्याने शेतकऱ्यांची उघड लूट सुरू असल्याचा आरोप होत आहे.

शेतकरी कर्ज काढून, व्याजाने पैसे आणून खत-बियाणे खरेदी करतो. पण तेच बियाणे उगवले नाही, खताची गुणवत्ता चांगली निघाली नाही, तर उत्पादन घटते. उत्पादन नाही, तर उत्पन्न नाही आणि उत्पन्न नाही तर घेतलेले कर्ज फेडायचे कसे? असा प्रश्न बळीराजासमोर उभा राहत आहे.

आज शेतकऱ्याच्या जीवावर कारखानदार गबरगंड, होलसेल व्यापारी गबरगंड आणि किरकोळ दुकानदार गबरगंड होत असताना मात्र शेवटी नुकसान सहन करण्याची वेळ फक्त शेतकऱ्यावर येत आहे. वर्षभर कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा, मुलांचे शिक्षण करायचे आणि कर्जाचे हप्ते भरायचे तरी कशाच्या भरवशावर? हा संतप्त सवाल शेतकरी वर्गातून उपस्थित होत आहे.

निकृष्ट दर्जाचे खत, डुप्लिकेट बियाणे आणि वाढीव दरामुळे अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडत असून, हीच परिस्थिती काहींना नैराश्य आणि आत्महत्येसारख्या टोकाच्या निर्णयांकडे ढकलत असल्याचे विदारक वास्तव आहे.

**प्रशासनाने आता तरी जागे व्हावे!**

खत उत्पादक कंपन्या, होलसेल व्यापारी, कृषी सेवा केंद्रे आणि किरकोळ विक्रेत्यांवर वेळोवेळी छापे, गुणवत्ता तपासणी आणि दरांची पडताळणी झाली, तरच शेतकऱ्यांची होणारी फसवणूक थांबू शकते. अन्यथा शेतकरी राजा ही केवळ घोषणाच राहील आणि प्रत्यक्षात त्याच्या खिशाला कात्री लावण्याचे उद्योग सुरूच राहतील.

बळीराजाच्या घामावर गबरगंड होणाऱ्यांवर कारवाई कधी? आणि शेतकऱ्याला न्याय कधी

शेतकरी जगला तरच देश जगेल; पण शेतकऱ्याच्या खिशाला कात्री लावणाऱ्यांना आवर घालणार कोण?

# धाराशिवमध्ये कमला एकादशी भक्तिभावात; श्रीसूक्त हवन व गीतापठणाने दुमदुमले शहर



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)– शहरातील एकादशी ग्रुपतर्फे वरोडा रोडवरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित श्रीसूक्त हवन व गीतापठण, तसेच यज्ञेश्वर महाराजांवर पुष्पवृष्टी करून तीन वर्षांतून एकदा येणारी कमला एकादशी ३०० ते ५०० भक्तांच्या उपस्थितीत मोठ्या भक्तीमय वातावरणात पार पडली.

शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित श्रीसूक्त हवन व गीतापठण कार्यक्रमासाठी गंगाखेड येथील यज्ञेश्वर महाराज (सेलूकर) यांची प्रमुख उपस्थिती होती. मंगल कार्यालयात श्रीसूक्त हवन व गीता पठणाने गुरुवारी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. गुरुवारी सकाळी नऊ वाजता यज्ञेश्वर सेलूकर महाराजांचे सर्व भक्तांनी पुष्पवृष्टी व पाकळ्यांची उधळण करून स्वागत केले. यावेळी सचिन हूलसूरकर व जयश्री हूलसूरकर या दाम्पत्यांच्या हस्ते गंगाखेड येथील यज्ञेश्वर महाराजांचे विशेष स्वागत करण्यात आले. महाराजांच्या आगमनानंतर लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात अग्निमंथन झाले. त्यानंतर उपस्थित भक्तांना १०० हवनकुंड देऊन श्रीसूक्त हवन यज्ञेश्वर महाराजांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यानंतर यज्ञेश्वर महाराजांची पाद्यपूजा कल्याण कुलकर्णी व त्यांच्या पत्नी यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर डॉ. अजित नायगावकर व शोभा अजित नायगावकर या दाम्पत्यांच्या हस्ते भगवद्गीतेची आरती करण्यात आली. यानंतर सर्व उपस्थित महिला भक्तांनी यज्ञेश्वर महाराजांना धोंडा अर्पण करून त्यांच्या दर्शनाचा लाभ घेतला. या कार्यक्रमाचे नियोजन भारतदादा मसलेकर, संजय ठाकरे, नंदकिशोर ठाकरे, बंडोपंत जोशी, उल्हास शहापुरे यांनी केले. कार्यक्रमासाठी एकादशी मंडळाच्या महिला सदस्य मनीषा गोवर्धन, वासंती कुलकर्णी, संगीता कनगरकर, सुवर्णा कुलकर्णी, लक्ष्मी मसलेकर यांचे विशेष योगदान लाभले. शेवटी राहुल जोशी व नंदकिशोर ठाकरे यांच्यातर्फे फराळ वाटप करण्यात आले. श्रीसूक्त हवन व गीतापठणासाठी धाराशिव शहरातील एकादशी ग्रुपच्या सदस्यांसह शहराच्या विविध भागांतील ३०० ते ५०० महिला भक्त सहभागी झाल्या होत्या.

भक्तीमय वातावरणात धार्मिक विधी लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात श्रीसूक्त हवन व गीतापठनाने परिसर मंत्रमुग्ध झाला. १०० हवनकुंडांमध्ये महाराजांच्या मार्गदर्शनात विधी पार पडले. भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमात सहभाग नोंदवला. सकाळपासूनच मंगल कार्यालयात भक्तीगीतांचा जयघोष सुरू होता. पुष्पवृष्टीमुळे संपूर्ण परिसर सुगंधित झाला. कार्यक्रमादरम्यान भाविकांनी श्रद्धेने महाराजांचे आशीर्वाद घेतले. सर्वत्र आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.


# लातूर समाचार धाराशिव

## बातम्या, लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708
9284321472


# मातृत्व अभियानांतर्गत ८७० अतिजोखमीच्या मातांवर उपचार: धाराशिव जिल्ह्यातील ३,९४१ गर्भवतींची मोफत तपासणी व समुपदेशन



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)– जिल्ह्यासह राज्यात माता मृत्यू आणि बालमृत्यूचे प्रमाण घटले असून यामध्ये केंद्र शासनाने सुरू केलेल्या 'प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाचा' मोठा वाटा आहे. नुकतेच या अभियानाला १० वर्षे पूर्ण झाली असून, या दशकपूर्तीनिमित्त धाराशिव जिल्हा आरोग्य विभागातर्फे जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व आरोग्य उपकेंद्रांमध्ये गरोदर मातांसाठी विशेष आरोग्य तपासणी मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

या मोहिमेला जिल्ह्यातील ५ हजारांहून अधिक गरोदर मातांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. धाराशिव जिल्ह्यात दि. ९ जून रोजी एकूण ३,९४१ गरोदर मातांची तपासणी करण्यात आली. यापैकी ८७० अतिजोखमीच्या मातांची तपासणी करून उपचार करण्यात आले. तसेच सर्व ३,९४१ मातांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. वरिष्ठ पातळीवरील सूचनांनुसार जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यात येत आहेत.

या विशेष मोहिमेअंतर्गत प्रामुख्याने दुसऱ्या आणि तिसऱ्या त्रैमासिकातील (४ ते ९ महिने) गरोदर महिलांची तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी व स्त्रीरोग तज्ज्ञांमार्फत मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

तपासणी दरम्यान रक्तदाब, वजन, रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण, लघवी तपासणी तसेच आवश्यकतेनुसार मोफत सोनोग्राफी करण्यात आली. अभियानाचे २०२६ चे घोषवाक्य सुरक्षित गर्भधारणा, निरोगी माता, सक्षम भारत असून त्यानुसार ही तपासणी मोहीम राबवण्यात आली. जिल्हा प्रशासनातर्फे प्रत्येक महिन्याच्या ९, १८ व २७ तारखेला हे अभियान राबवले जाते. जिल्ह्यातील सर्व गरोदर मातांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

यामुळे सुरक्षित माता व सुदृढ बाळ हे उद्दिष्ट साध्य होईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा म्हाडदळकर व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांनी सांगितले

# किशोरींना शिलाई मशीन, सायकल व शेळ्यांचे वाटप

लोहारा (प्रतिनिधी)– तालुक्यातील हिप्परगा (सय्यद) आणि वडगाववाडी येथे झेप किशोरी विकास प्रकल्पांतर्गत गरजू मुलींना शिलाई मशीन, सायकल, शेळ्या व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे मुलींचे शिक्षण सुरू राहण्यासह त्यांच्या कुटुंबांच्या उत्पन्नवाढीसही हातभार लागणार आहे.

हॅलो मेडिकल फाउंडेशन, अणदूर व स्विसएड संस्थेच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणारा झेप किशोरी विकास प्रकल्प जून २०२५ पासून लोहारा व तुळजापूर तालुक्यातील ३० गावांमध्ये कार्यरत आहे. १३ ते १७ वयोगटातील किशोरींमध्ये लिंगभाव समज वाढवणे, निर्णयक्षमता विकसित करणे, जीवनकौशल्ये निर्माण करणे आणि बालविवाह रोखण्यासाठी त्यांना सक्षम बनवणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. या प्रकल्पांतर्गत गावपातळीवरील 'सखी' यांच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले जात आहेत. तसेच गरजू व असुरक्षित मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवण्यासाठी उत्पन्नवाढीची साधने उपलब्ध करून दिली जात आहेत. हिप्परगा (सय्यद) येथे चार मुलींना शेळ्या व एका मुलीला शिलाई मशीन देण्यात आली. तर वडगाववाडी येथे एका मुलीला शेळी, तीन मुलींना सायकल व शैक्षणिक साहित्य देण्यात आले. या कार्यक्रमासाठी स्विसएडच्या स्नेहा गिरिधारी, प्रकल्प अधिकारी जितेंद्र सावकर, हॅलो मेडिकल फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. शुभांगी अहंकारी, प्रकल्प संचालक डॉ. क्रांती रायमाने, समन्वयक नागिनी सुरवसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी ग्रामपंचायत अधिकारी आशिष गोरे यांनी झेप किशोरी विकास प्रकल्पाच्या कार्याचे कौतुक करून संस्थेचे आभार मानले. किशोरी सक्षमीकरणाचा उपक्रम झेप किशोरी विकास प्रकल्पांतर्गत १३ ते १७ वयोगटातील मुलींना निर्णयक्षमता, शिक्षण टिकवणे, बालविवाह प्रतिबंध आणि जीवनकौशल्य विकासावर भर दिला जात आहे. लोहारा व तुळजापूर तालुक्यातील ३० गावांमध्ये हा प्रकल्प कार्यरत असून 'सखी' नेटवर्कद्वारे गावपातळीवर विविध उपक्रम राबवले जात आहेत. मुलींना शिक्षणात टिकवण्यासाठी आर्थिक सहाय्य व उत्पन्नवाढीची साधने उपलब्ध करून देणे हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

# शेतीवरील अतिक्रमणा विरोधात महिलेचे उन्हात रस्त्यावर उपोषण

उमरगा (प्रतिनिधी)– उमरगा वागदरी येथील महिला वनिता बंकट वाडीकर यांनी स्वतःच्या जमीन व घरावरील अतिक्रमणा विरोधात प्रशासनाचे निष्क्रियतेवर आरोप करत बुधवारी (१०) सकाळी अकरापासून तहसील कार्यालयासमोर मेन रोडवर भर उन्हात आमरण उपोषण सुरू केले. मुख्य रस्त्यावर उन्हात तहसील कार्यालयाच्या आवारात उपोषणास न बसता कार्यालयासमोर रस्त्यावर वनिता वाडीकर उन्हात अचानक येत एकट्याच तासभर बसून राहिल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच पोलिस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी हे पोलिस पथकासह घटनास्थळी धाव घेत सदर महिलेला रस्त्यावर उपोषण करणे अयोग्य आहे गुन्हा दाखल होईल, असे सांगून त्यांना तहसील कार्यालयात घेऊन गेले. नायब तहसीलदारांनी संबंधित महिलेला पत्र देऊन पुढील कारवाईचे आश्वासन दिले.

वाडीकर यांनी दिलेल्या निवेदनात, त्यांचे वडिलोपार्जित जमीन, घरावर त्यांच्याच तीन दीरांनी व कुटुंबातील सदस्यांनी बेकायदा अतिक्रमण केले आहे. मी एकटी महिला आहे, माझ्यामागे कोणी नाही म्हणून माझी जमीन हडपली जात आहे. सन २०१८ मध्ये कोर्टाने निकाल देऊनही न्याय मिळत नसल्याने प्रशासनाविरूध्द आरोप केला. याबाबत त्यांनी दि. १८ मे रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. मात्र, आजतागायत कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने आर्थिक व मानसिक खच्चीकरण होत असल्याचे त्यांनी सांगितले. अधिकाऱ्यांना अहवाल सादर करण्याचे आदेश दरम्यान पोलिस प्रशासन व महसूल प्रशासनाने महसूल विभागाने मंडळ अधिकारी यांना पत्र व्यवहार करून याचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्याचे पत्र दिल्याने तूर्त आंदोलन मागे घेण्यात आले.

काय बरे वाईट झाल्यास प्रशासनच जबाबदार सौ वाडीकर यांनी तहसीलदारांना दिलेल्या नोटीसमध्ये स्पष्ट इशारा दिला आहे, आरोपींवर तात्काळ फौजदारी कारवाई करून मालमत्तेचा ताबा द्यावा. उपोषणादरम्यान माझ्या जीवितास काही बरेवाईट झाल्यास त्यास सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, असे त्यांनी नमूद केले आहे

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649